जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जिल्हा सहकारी बँक : सोसायटीची की कारखानदारांची भाऊसाहेबांनी जे नाकारले ते बाळासाहेब का स्वीकारतात





सहकार आणि व्यापारी बँकामध्ये मूलभूत फरक असतो त्यांची रचना व कार्यपध्दतीत बदल असतो. सहकारी बँकेची त्रिस्तरिय (थ्री टायर) पद्धतीची रचना असते. जिल्ह्याच्या गावोगावी ज्या विविध कार्यकारी सोसायटी असते. तीच जिल्हा बँकेची सभासद असतात. थेट शेतकरी सभासद नसतात ते सोसायटीचे सभासद असतात. सोसायटी सभासद जिल्हा बँकेचे संचालक निवडतात. विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालकांपैकी एकाला ज्याचा सोसायटी ठराव करते. त्याला जिल्हा बँक संचालकसाठी मतदान करता येते असे १४ तालुक्यातून संचालक निवडले जातात. बिगर शेती (१) शेती पुरक (१) ओबीसी (२) एस.टी. (१) महिला (२) या सात जागांसाठी बँक सभासदाचे मतदान (जनरल) असते जिल्हा बँक ही राज्याच्या शिखर बँकेशी संलग्न असते सोसायटी सभासद जिल्हा बँकेचे संचालक निवडते तर जिल्हा बँकेतून राज्य सहकारी म्हणजे शिखर बँकेचे संचालक निवडले जातात. अहिल्यानगरच्या जिल्हा बँकेने मोतीलाल फिरोदिया यांना शिखर बँकेवर तब्बल ३५ वर्षे संचालक म्हणून पाठवले होते. हा सहकार क्षेत्रातील वेगळा विक्रम मानला जातो.

त्याच्यानंतर यशवंतराव गडाख शिखर बँकेवर संचालक झाले. मूळ मुद्दा हा आहे की, सोसायटी हाच सहकारी बँकेचा पाया आहे. विशेष म्हणजे विविध कार्यकारी सोसायटीच्या हक्कासाठी नगर जिल्ह्यातून आक्रमक आंदोलने झाली त्याचे नेतृत्व भाऊसाहेब थोरात यांनीच सातत्याने केले. राज्य सरकार आणि शिखर बँकेला त्या संदर्भात लक्ष देऊन आश्वासने द्यायला भाग पाडले. अगदी सोसायटी सचिवांच्या पगाराच्या मागण्यांवर त्यांच्या पदाच्या दर्जाबाबत भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा बँकेला तडजोड करायला भाग पाडले तोच पॅटर्न राज्यभर राबवण्यात आला. हा इतिहास दुर्लक्षून चालता येणार नाही. सोसायटीच्या हक्क संरक्षणासाठी भाऊसाहेब थोरात ढाल बनून लढले होते. त्याच जिल्हा बँकेत सोसायट्यांवर अन्याय होतो. त्यांना सवलती देण्याऐवजी साखर कारखान्यावर मोठ्या प्रमाणावर सवलतीचा वर्षाव केला जातो. तो रोष जिल्हा बँकेच्या नुकत्याच झालेल्या ६९ व्या वार्षिक सभेत प्रकर्षाने प्रगट झाला. कारखान्याकडे प्रचंड कर्ज असून त्यांच्या सवलतीचा पाऊस पडतो हा राग सोसायटी सभासदांना असल्यामुळेच जिल्हा बँक निवडणुकीसाठी पहिल्यांदाच विक्रमी प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल झालेत पण बँकेत विशेष

प्रभाव पाडू शकणाऱ्या बाळासाहेब थोरात यांनी जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन करत राधाकृष्ण विखे आणि यशवंतराव गडाख यांच्या सुरात सूर मिळवत पुढाकार घेतला आहे. एकेकाळी भाऊसाहेबांबत यशवंतराव गडाख यांनी आमचे आयुष्य तुम्हाला लाभो अशी टिपण्णी केली. भाऊसाहेब थोरात यांनी नाकारले होते. तेच बाळासाहेब थोरात जिल्ह्याच्या कारखानदारांना एकत्र करून विखेंना घेऊन बिनविरोधची व्यूहरचना करत आहेत. हे सोसायटीच्या हितरक्षणाला बाधा आणणारे ठरु शकते.

## विस्थापितांचा एल्गार

जिल्हा बँकेची निवडणूक चुरसीची होणार की बिनविरोध हे येत्या तीन-चार दिवसात चित्र स्पष्ट होईल पण निवडणूकपूर्व विस्तापितांनी जो एल्गार पुकारला त्याची चुणूक बँकेच्या वार्षिक सभेतून आली आहे. बँकेतील प्रस्तापित राजकीय मतभेद बाजुला ठेऊन एकत्र येत आहेत. थोरात - विखे यांचे आवाहन तसेच सुचित करते. वास्तविक गेल्या तीस-चाळीस वर्षाच्या बँक राजकारणाच्या इतिहासावर दृष्टीक्षेप टाकला तर थोरात आणि विखे परस्पर लढत आले मग आता तेच

विरोधक बिनविरोधच्या नावाखाली एकत्र का येत आहेत कुटप्रश्न आहेच, थोरातांचा गोतावळा लक्षात घेता त्यांच्या वर्चस्वाला फारसा तडा जाईल अशी राजकीय स्थिती नाही पण ती अवस्था विखे गटाची नाही. विखे यांना उत्तरेतील राहाता आणि दक्षिणेतून जामखेड, पारनेर, कर्जत आणि श्रीगोंदा येथून पाठबळ मिळत होते. जामखेडमधून सोले पाटील पारनेरमधून भगत, कर्जतला पिसाळ, श्रीगोंद्यात शिवाजीराव पाचपुते अथवा अन्य नेत्यांचे पाठबळ मिळायचे पण आता कर्जत-जामखेडवर सभापती प्रा.राम शिंदे यांनी प्रभूत्व निर्माण केलेले दिसते. ते स्वतः उमेदवार असणार श्रीगोंद्यात त्यांना माजी आमदार राहुल जगताप यांची साथ मिळणार. पारनेरमध्ये खासदार निलेश लंके यांचा सवता सुभा दिसतो अकोल्यात राष्ट्रवादी (अजितदादा) चे आमदार लहामगे यांनी आक्रमक भूमिका घेऊन बँकेच्या नोकरभरतीची निवडणूक पार्श्वभूमीवर भांडेफोड केली आहे. शेवगावमधून कधी नव्हे ती हर्षदा काकडे यांनी एल्गार पुकारला आहे तर श्रीरामपुरमधून माजी आमदार बी.के. मुरकुटे यांनी आवाज वाढवला आहे. नेवाशात आमदार विठ्ठलराव लंघे यांचा आक्रमक पवित्रा दिसतो. संगमनेरमध्ये आमदार खताळ यांचा विरोध सर्वश्रुत आहे. पक्षीय राजकारणाचा विचार करता काँग्रेस आणि भाजप व बिनविरोधच्या टूमखाली एकत्र येऊ पाहत आहेत त्यांनी सोयीस्कररीत्या शिवसेना (शिंदेगट) ला अलगद बाजुला करण्याचा प्रयत्न चालवलेला दिसतो. त्यांना, सोसायटी सभासदांमध्ये जो असंतोष निर्माण झाला. त्याचा कितपत लाभ होऊ शकतो हे लवकरच स्पष्ट होइल.

## विस्तापित झाले प्रस्थापित

जिल्हा बँकेच्या राजकारणात एकेकाळी यशवंतराव गडाख हेच विस्तापितांचे नेतृत्व करत होते पण कालांतराने ते कारखानदार म्हणून प्रस्तापितांमध्ये सामिल झाले तीच स्थिती शिवाजीराव कर्डीले यांची झाली प्रारंभीच्या काळात त्यांना प्रस्तापितांनी प्रचंड विरोध झाला. पण नगर तालुका सोसायटी मतदारसंघातून निवडून आले पुढे ते दोन-तीन टर्म संचालक राहिले बँकेत कर्डिले यांच्या बरोबर त्यांच्या गोतावळ्यातील भानुदास कोतकर आणि त्यांची पत्नी संचालक झाली. पुढे माजी आमदार अरुणकाका जगताप हे संचालक झाले. यावेळी नगर तालुक्यातून आमदार अक्षय कर्डीले यांचा संचालक होण्याचा मार्ग निर्विघ्न दिसतो. कोतकर घराण्याकडून कोणी उमेदवारी करील का हे अद्याप अनुत्तरितच आहे. आमदार संग्राम जगताप यांची उमेदवारी गुलदस्त्यात आहे. त्यांना कर्डिलेंसारखा सुरक्षित मतदारसंघ नाही. जनरलच्या जागेवर उमेदवारी करावी लागेल ते कोणत्या पॅनलमधून उभे राहणार यावर सारे गणित अवलंबून राहिल. पण शुगर लॉबी कर्डीले -जगताप-कोतकर गोतावळ्याला फारशी स्वीकारते अशी सकृतदर्शनीय अवस्था दिसत नाही. त्यांनी त्यांच्या राजकीय बळावर स्थान निर्माण केले आहे असे किरकोळ अपवाद वगळता बँकेत प्रस्तापितांना शक्यतो कोणी आव्हान देऊ शकत नाही. हा आतापर्यंतचा इतिहास आहे पण आतापर्यंत भाऊसाहेब थोरात यांनी बँकेच्या राजकारणात विखेंना नाकारले त्यांना बिनविरोधची टूम पुढे करून बाळासाहेब थोरात का स्वीकारत आहेत हा कुटप्रश्न अनुत्तरित राहतो.

**(या लेखाचा पुढील भाग नंतरच्या अंकात)**

**- रामदास ढमाले,**
ज्येष्ठ पत्रकार, मोबा. ८९९९८१०००३

# गुंतवणुकीचा पर्याय निवडण्याआधी, त्याचं काम समजून घ्या

गुंतवणूक करण्याचा विचार केला की एक प्रश्न नेहमी समोर येतो-कुठे गुंतवू?


राजन कुटे

आज बाजारात गुंतवणुकीचे अनेक पर्याय आहेत. बँकेच्या ठेवी आहेत, बॉण्ड्स आणि इतर कर्जरोखे आहेत, म्युच्युअल फंडांच्या विविध योजना आहेत, इक्विटीशी (शेअर्स शी) संबंधित पर्याय आहेत आणि त्यातही अनेक प्रकार उपलब्ध आहेत. त्यामुळे पर्यायांची कमतरता नाही; उलट अनेकदा पर्यायांची संख्या जास्त असल्यामुळेच निर्णय कठीण होऊन बसतो.

पण कदाचित सुरुवातीचा प्रश्न थोडा वेगळा असायला हवा. कुठे गुंतवू? याआधी या पैशाचं काम काय आहे? हा प्रश्न विचारला तर गुंतवणुकीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. प्रत्येक पैशाची एकच भूमिका नसते. काही पैसा आपत्कालीन परिस्थितीसाठी लागतो, काही पैसा काही वर्षांनी येणाऱ्या मोठ्या खर्चासाठी असतो, तर काही पैसा दीर्घकाळासाठी ठेवायचा असतो आणि त्याच्याकडून संपत्ती वाढवण्याची अपेक्षा असते. त्यामुळे या सगळ्या पैशांना एकाच प्रकारच्या गुंतवणुकीत साचेबद्ध करणं आवश्यकच आहे असं नाही. उदाहरणार्थ, पुढील सहा महिन्यांत वापरायचे पैसे आणि पुढील पंधरा वर्षांसाठी ठेवलेले पैसे यांच्याकडून आपण एकच अपेक्षा ठेवू शकत नाही. पहिल्या पैशासाठी उपलब्धता (liquidity) आणि स्थैर्य (Stability) महत्त्वाचं असू शकतं. दुसऱ्या पैशासाठी दीर्घकालीन वाढीची क्षमता अधिक महत्त्वाची ठरू शकते.

ईथे गुंतवणुकीच्या उत्पादनांची खरी उपयुक्तता समजून घेणं महत्त्वाचं ठरतं. म्युच्युअल फंडाचंच उदाहरण घ्या. म्युच्युअल फंड म्हणजे एकच प्रकारची गुंतवणूक नाही. काही योजना प्रामुख्याने इक्विटी (शेअर्स) मध्ये गुंतवतात, काही कर्जरोख्यांमध्ये, तर काही वेगवेगळ्या मालमत्ता वर्गांचं मिश्रण ठेवतात. त्यामुळे म्युच्युअल फंड चांगला आहे का? हा प्रश्न नसून, कोणत्या प्रकारचा फंड, कोणत्या पैशासाठी आणि कोणत्या कालावधीसाठी-हे प्रश्न त्याआधी येतात.

इक्विटीशी (शेअर्स शी) संबंधित गुंतवणुकीकडून दीर्घकालीन वाढीची अपेक्षा ठेवता येते; पण त्याच वेळी अल्पकालीन चढ-उतार स्वीकारावे लागू शकतात, कर्जाधारित गुंतवणुकीचा उपयोग तुलनेने वेगळ्या प्रकारच्या गरजांसाठी होऊ शकतो तर मिश्र स्वरूपाच्या योजनांमध्ये वाढीची आणि स्थैर्याची दोन्ही बाजू काही प्रमाणात एकत्र आणण्याचा प्रयत्न करता येतो. याचा अर्थ असा नाही की कोणताही पर्याय पूर्णपणे सुरक्षित किंवा हमखास फायदेशीर आहे. प्रत्येक पर्यायाची स्वतःची भूमिका, मर्यादा आणि जोखीम असते.

म्हणून एखादी योजना गेल्या वर्षी चांगली चालली म्हणजे ती आपल्या पैशासाठी योग्य आहे असं होत नाही. त्याचप्रमाणे एखाद्या पर्यायाचा परतावा कमी दिसतो म्हणून तो निरुपयोगी आहे असंही होत नाही.

खरा प्रश्न असा आहे-हा पैसा कधी लागणार आहे? त्याला किती काळाची मुभा आहे? तो किती चढ-उतार पेलू शकतो? आणि त्याच्याकडून आपल्याला नेमकं काय हवं आहे? याचा अर्थ गुंतवणुकीचा निर्णय फक्त उत्पादन (product) निवडण्याचा निर्णय राहत नाही, तो पैशाला योग्य काम देण्याचा निर्णय बनतो.

समजा, एखाद्या कुटुंबाकडे ₹१० लाख आहेत. ते संपूर्ण पैसे एका पर्यायात ठेवायचे की वेगवेगळ्या गरजांनुसार त्यांची भूमिका ठरवायची, हा पहिला विचार असायला हवा. कारण काही रक्कम जवळच्या गरजांसाठी असेल, काही स्थैर्यासाठी आणि काही दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी असेल, तर त्या प्रत्येक पैशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असायला हवा.

इथे उत्पादनाची माहिती उपयोगी ठरते. उत्पादन माहितीचा उद्देश हा पर्याय घ्या असं सांगणं नसतो. त्याचा उद्देश असा असतो की आपल्याला उपलब्ध पर्यायांमधला फरक समजावा आणि आपल्या पैशाला कोणता पर्याय कोणतं काम करून देऊ शकतो, हे स्पष्ट व्हावं. गुंतवणुकीत योग्य पर्याय म्हणजे सर्वाधिक परतावा देणारा पर्याय असेलच असं नाही, योग्य पर्याय तो असायला हवा, जो त्या पैशाच्या उद्देशाशी, कालावधीशी, जोखीम पेलण्याच्या क्षमतेशी आणि भविष्यातील गरजेशी जुळणारा असतो.

म्हणून पुढच्या वेळी कुठे गुंतवू? हा प्रश्न मनात आला, तर त्याआधी एक छोटासा प्रश्न स्वतःला विचारून पाहा - या पैशाचं काम काय आहे?

कारण पैसा कुठे ठेवला आहे यापेक्षा, तो आपल्या आयुष्यात कोणतं काम करत आहे हे समजून घेणं अधिक महत्त्वाचं आहे.

गुंतवणुकीचा पर्याय निवडण्यापूर्वी त्याचा परतावा पाहा; पण त्याआधी त्याचं काम समजून घ्या.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# रिक्षाचालकावर लोखंडी रॉड, दगडाने हल्ला

नगर - अहिल्यानगर शहरातील साईदीप हॉस्पिटल परिसरातील रिक्षा स्टॉपवर एका रिक्षाचालकाला लोखंडी रॉड अन् दगडाने मारहाण केल्याची घटना २ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली आहे.

याबाबत अब्दुल सलाम अलीम सय्यद (वय २३, रा. नसेमन कॉलनी, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचे रिक्षाभाडे भरण्यासाठी थांबले असताना ही घटना घडली. गैरसमजातून आरोपी शाहिद शेख याने तिथे येऊन वाद घातला. माझ्याविषयी कोणी काही बोलतंय का? असे म्हणत आरोपीने फिर्यादीला हाताने चापट्या मारल्या. त्यानंतर लोखंडी रॉडने त्यांच्या डाव्या हातावर प्रहार केला. एवढ्यावरच न थांबता जमिनीवरील दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# सर्रास सुरू असलेले अवैध धंदे त्वरित बंद करा अन्यथा ५ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण

## एमआयडीसी पोलिसांना निवेदन

नगर - एमआयडीसी हद्दीतील विविध गावांमध्ये हातभट्टी दारू, गांजा, मावा, बिंगो, सोरट, मटका, जुगार यांसह अन्य अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर व खुलेआम सुरू असल्याचा आरोप करीत हे सर्व धंदे तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. या अवैध व्यवसायांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावले असून, युवक व्यसनाधीन होत असल्याचा दावा महिला आघाडीने केला आहे.


एमआयडीसी हद्दीतील अवैध धंदे तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या शिष्टमंडळाच्यावतीने एमआयडीसी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यासंदर्भात शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांची भेट घेऊन निवेदन दिले. एमआयडीसी हद्दीतील सर्व गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई करून ते कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार, रेश्मा जाधव, मनीषा गायकवाड, सोनाली साळवे, शितल नाटीकर, धोंडाबाई हिरवटे, शितल जाधव उपस्थित होत्या.

महिला आघाडीच्या म्हणण्यानुसार, एमआयडीसी परिसरातील अनेक गावांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून हातभट्टी दारू, जुगार, बिंगो, सोरट, मटका, गांजा व मावा विक्रीसारखे व्यवसाय खुलेआम सुरू आहेत. हे व्यवसाय चालविणाऱ्यांमध्ये कायद्याची कोणतीही भीती राहिलेली नसून, ते उघडपणे आपले व्यवसाय करीत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.या अवैध धंद्यांचा सर्वाधिक परिणाम सर्वसामान्य कुटुंबांवर होत असल्याचे महिला आघाडीने म्हटले आहे. एमआयडीसी परिसरातील अनेक कुटुंबे रोजंदारीवर अवलंबून आहेत. दिवसभर कष्ट करून मिळणाऱ्या पैशातून घरातील चूल पेटते. मात्र, कामावरून घरी परतताना काही युवक व नागरिक हातभट्टीच्या अड्ड्यांवर जाऊन दारूचे सेवन करतात आणि कष्टाने कमावलेला पैसा व्यसनाधीनतेमध्ये खर्च करतात. परिणामी घरातील आर्थिक परिस्थिती आणखी बिकट होत असून, कुटुंबातील महिलांना व मुलांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दारूच्या व्यसनामुळे काही कुटुंबांमध्ये घरगुती वाद आणि मारहाणीच्या घटना वाढत असल्याचा आरोपही महिला आघाडीने केला आहे. हातभट्टी दारूच्या व्यवसायामुळे युवकांचे संसार उद्ध्वस्त होत असून, काही युवकांच्या मृत्यूच्या घटनाही घडल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे अवैध दारू विक्रीसह इतर सर्व अवैध धंद्यांविरोधात पोलिस प्रशासनाने ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाई करणे गरजेचे असल्याचे आघाडीने म्हटले आहे.

एमआयडीसी हद्दीतील गावांमध्ये हातभट्टी दारूसोबतच मटका, जुगार, बिंगो, सोरट, गांजा आणि मावा विक्रीचे व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करीत या सर्व प्रकारांवर पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ अधूनमधून कारवाई न करता हे व्यवसाय कायमस्वरूपी बंद होतील, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे. सर्व गावांमधील अवैध धंदे दोन दिवसांत तातडीने बंद करण्यात यावेत, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## विजय लिंगुजवार यांचे निधन

नगर - तोफखाना परिसरातील रहिवाशी विजय नंदकुमार लिंगुजवार (वय ६२) यांचे २ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, दोन भाऊ, दोन बहिणी, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सुनील स्क्रिनचे सुनील लिंगुजवार यांचे ते मोठे बंधु होत.

## लक्ष्मीबाई पाखरे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - बुरुडगाव रोड, भोसले आखाडा येथील जिजामाता शाळेजवळील रहिवाशी लक्ष्मीबाई पांडुरंग पाखरे (वय ८५) यांचे ३ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## योगेश (दद्दू) परदेशी यांचे निधन

नगर - 'श्रीशक्ती' कराचीवालानगर येथील रहिवाशी योगेश (दद्दू) अरूण परदेशी (वय ४२) यांचे ३ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, २ भाऊ, एक बहिण, एक मुलगी असा परिवार आहे. कापडबाजार येथील 'श्री' एजन्सीचे ते संचालक होते.

## अनंतराव सैंदाणे यांचे निधन

नगर - पानसरे गल्ली येथील रहिवाशी अनंतराव रंगनाथ सैंदाणे (वय ७४) यांचे २ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. नगर अर्बन बँकरोड येथील ब्युटी सलुनचे संचालक विशाल व वैभव सैंदाणे यांचे ते वडील होत.

# ड्रेनेज लाईन व ऐतिहासिक बारवेच्या प्रश्नावर ४ ऑक्टोबरला उपोषण

**माजी उपसरपंचाचा इशारा, ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभारावर आक्षेप**

नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या काँक्रिटिकरणादरम्यान ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी आणि १५० ते २०० वर्षांपासून गावाला पाणी पुरवठा करणारी ऐतिहासिक बारव बुजवण्यात येऊ नये, या प्रमुख मागण्यांसाठी येथील माजी उपसरपंच जयप्रकाश भास्करराव पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून श्री हनुमान मंदिर, सारोळा कासार येथे आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासनाला दिला आहे.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, सारोळा कासार येथील देवीभोयरे ते पारनेर मार्गे खडकी या नवीन काँक्रिटिकरणाच्या रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम करत असताना गावाच्या हद्दीत इतर गावांप्रमाणेच ड्रेनेज लाईन तयार करून सांडपाण्याची व्यवस्था करणे गरजेचे होते. मात्र, रस्त्याचे काम सुरू असताना पूर्वीची ड्रेनेज लाईन उखडून टाकण्यात आल्यामुळे आणि नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच मनमानी कारभार करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ड्रेनेज लाईन न झाल्यास गावात आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तसेच, गेल्या १५० ते २०० वर्षांपासून संपूर्ण गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी जुनी बारव बुजविण्याचा घाट ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या विरोधामुळे बारव वगळून रस्त्याचे काम सुरू केले असले, तरी त्या शेजारील जिवंत बोरवेलचे पाणी नवीन बांधलेल्या विहिरीत सोडण्याचे नियोजन केले जात आहे. नवीन विहिरीमध्ये बोअरवेलचे पाणी नेण्यास आमचा विरोध नाही, परंतु जुन्या बारवचे कनेक्शन बंद करून ती जागीच बंद करणे चुकीचे असून यामुळे महिला वर्गाला रात्रीच्या वेळी पाणी भरण्यासाठी लांब व असुरक्षित ठिकाणी जावे लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत या दोन्ही मागण्यांचा निपटारा न झाल्यास त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजल्यापासून श्री हनुमान मंदिर, सारोळा कासार येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याचे जयप्रकाश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. ग्रामस्थांना होणाऱ्या त्रासाला व उपोषणाला ग्रामपंचायतीचे सरपंच वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील, असे नमूद करत या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार तसेच नगर तालुका पोलीस ठाण्याला माहितीसाठी व कारवाईसाठी पाठवण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### कानाची राखा निगा

कानातला मळ हा खरे तर घाण नसून निसर्गाने आपल्या संरक्षणासाठी बनवलेला थर आहे. हा थर बाहेरची धूळ, माती आणि लहान जीवजंतू कानाच्या नाजूक भागात जाण्यापासून थांबवतो आणि साधारणपणे आपण बोलताना आणि जेवताना जबड्याची हालचाल होते तेव्हा हा मळ आपोआप बाहेर पडत असतो. पण आपल्या काही चुकीच्या सवयींमुळे तो बाहेर न पडता आतच घट्ट होऊन साठून राहतो. यामध्ये सर्वात मोठी चूक म्हणजे रोज काडीने कान कोरत बसणे, काडीने मळ बाहेर येत नाही तर तो आणखी आत ढकलला जातो आणि मग तो सुकून दगडासारखा घट्ट होतो. त्याचबरोबर दिवसभर हेडफोन लावून ठेवणे, कानात सतत काही ना काही घालणे, कानाच्या नळीचा आकार लहान असणे किंवा कानात जास्त केस असणे यामुळेही मळ साठण्याचे प्रमाण वाढते. जेव्हा मळ साठतो तेव्हा सुरुवातीला फक्त कान भरल्यासारखा वाटतो, आपलाच आवाज आपल्याला मोठा आणि घुमल्यासारखा ऐकू येतो, हळूहळू ऐकू कमी येऊ लागते आणि सतत खाज येणे किंवा अधून मधून टोचल्यासारखे दुखणे सुरू होते. कानाची खरी काळजी म्हणजे कानात काहीही न घालणे. आंघोळीनंतर फक्त बाहेरचा भाग कोरड्या मऊ कापडाने हलकेच पुसावा, आतून कोरडा करण्याचा प्रयत्न करू नये. पोहताना कानात पाणी गेले तर डोके तिरके करून पाणी बाहेर येऊ द्यावे. जर कान खूप दुखत असेल, त्यातून पू किंवा पाणी येत असेल, ताप येत असेल, एकदम ऐकणे बंद झाले असेल किंवा कानात सतत शिट्टी वाजल्यासारखा आवाज येत असेल तर घरी कोणतेही थेंब टाकत बसू नये आणि थेट कान नाक घसा तज्ञ डॉक्टरांना दाखवावे. डॉक्टर दुर्बिणीतून कानाच्या आत पाहून मळ किती आणि कसा साठला आहे ते बघतात आणि मग मळ मऊ करण्यासाठी काही थेंब देतात किंवा सुरक्षित यंत्राने काही मिनिटात तो मळ बाहेर काढतात, यात घाबरण्यासारखे काहीही नसते.

## पाककला

### शाकाहारी व्हेज छोले मसाला

**साहित्य :** भिजवलेले चणे १ वाटी, कांदा २, टोमॅटो २, आले लसूण पेस्ट १ चमचा, तेल २ चमचे, छोले मसाला १ चमचा, हळद, तिखट, मीठ, कोथिंबीर.

**कृती :** चणे कुकरला उकडून घ्या. कढईत तेल गरम करून कांदा, आले लसूण पेस्ट, टोमॅटो परता. त्यात सर्व मसाले, मीठ घालून परता. उकडलेले चणे घालून थोडे पाणी घाला आणि ५ मिनिट शिजवा. वरून कोथिंबीर घालून सर्व्ह करा.

## वास्तू

### मुले अभ्यास करत नसतील तर...

मुलं अभ्यास करत नसतील तर सर्वात पहिला वास्तु दोष म्हणजे त्यांची अभ्यासाची दिशा चुकलेली असणे. मुलांचे अभ्यास करताना तोंड नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला असावे. या दिशेला तोंड केल्याने मेंदू शांत राहतो आणि अभ्यासात लक्ष लागते. अनेक घरात मुलांचे टेबल दक्षिणेकडे किंवा खिडकीच्या अगदी समोर असते, खिडकी समोर बसल्याने बाहेर लक्ष जाते.

## सौंदर्य

मेकअप झाल्यावर शेवटी सेटिंग स्प्रे किंवा फक्त गुलाब पाणी दूरून हलका स्प्रे करावा आणि शेवटी हलकी पावडर ब्रशने फिरवावी, याने मेकअप लॉक होतो. दिवसभरात सारखा चेहरा हाताने पुसू नये.

## सल्ला

चहा जास्त वेळ गरम राहण्यासाठी कप आधी गरम पाण्याने धुऊन घ्या. स्टील ऐवजी कुल्हड किंवा सिरॅमिक कप वापरा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६

**अविधवा नवमी, नवमी श्राद्ध, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, पुनर्वसू २४।१४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** – आजचा दिवस मिश्र फलदायी आहे. कुटुंबियांसह महत्त्वपूर्ण चर्चा कराल. बौद्धिक क्षेत्रात प्रगती आणि प्रसिद्धी लाभेल.

**वृषभ** – आज नवीन काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि त्याची सुरुवात कराल. एखाद्या रमणीय स्थळाला भेट द्याल.

**मिथुन** – संतापाची भावना नुकसान करेल. आजारी व्यक्तींची तपासणी किंवा शस्त्रक्रिया करावी लागेल.

**कर्क** – संवेदनशीलता व प्रेमाने व्याप्त होऊन मन भिन्नलिंगी व्यक्तीकडे आकर्षित होईल.

**सिंह** – उदासीनता व साशंक वृत्ती मनाला अस्वस्थ करेल. दैनंदिन कामे पूर्ण व्हायला विलंब लागेल.

**कन्या** – संतती समस्येमुळे चिंता राहील. अपचनासारख्या पोटाच्या तक्रारी राहतील. विद्यार्थ्यांना अभ्यासात अडथळे येतील.

**तूळ** – खूप भावनाशील व्हाल व त्यामुळे मानसिक अस्वास्थ्य राहील. आईशी मतभेद होतील.

**वृश्चिक** – कामात यश मिळून आर्थिक लाभ होतील. नशिबाची साथ मिळेल. भावंडांशी कौटुंबिक चर्चा होईल.

**धनु** – कुटुंबियांशी गैरसमज निर्माण झाल्यामुळे मतभेद वाढतील. मानसिक व्यवहारात खंबीरता नसेल. अचानक धनलाभाची शक्यता आहे.

**मकर** – दिवसाची सुरुवात प्रसन्न वातावरणाने होईल. घरात मंगलमय वातावरण राहील.

**कुंभ** – आर्थिक देवाण-घेवाण किंवा जामीनकीत फसवणूक होण्याची शक्यता आहे. एकाग्रता न झाल्याने मानसिक अस्वास्थ्य वाढेल.

**मीन** – समाजात सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त कराल. सामाजिक कामात भाग घ्यावा लागेल.

## शब्दगंध क्र. ७५२९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | |
| ७ | | | | ८ | ■ | | ■ |
| | ■ | ■ | ■ | ९ | १० | | |
| ११ | १२ | | ■ | १३ | | | ■ |
| ■ | | ■ | १४ | | | ■ | १५ |
| १६ | | १७ | | ■ | ■ | १८ | |
| | ■ | | ■ | १९ | | | |
| २० | | | | | ■ | २१ | |

**आडवे शब्द :-** १) श्रम; कष्ट ५) मोजके; नेमके ७) चलाख; हुशार; ताजातवाना ९) सोडचिठ्ठी; घटस्फोट; काडीमोड ११) मेल; डाक; पोस्ट १३) उरलासुरला वाईट भाग; गाळ १४) लवकर न तुटणारे; लवचीक १६) समाधी; कबर; थडगे १८) एक धान्य; जव; सातू १९) मदत; साह्य; पाठीशी उभे राहणे २०) एक तीव्र रेचक औषध २१) लढाई; युद्ध; युद्धभूमी; वाळवंट

**उभे शब्द :-** १) तांदूळ व काही डाळी यांचे दळलेले रुचकर मिश्रण २) महादेव; नीळकंठ; सदाशिव; शंकर; प्रत्येक; दर ३) वाकलेला; झुकलेला ४) जलमार्ग; पाणी धरणारी जमीन; कचकच ६) स्पष्टवक्ता; भीडभाड न ठेवता बोलणारा ८) अंतर; फरक १०) भरपूर; खूप; पुष्कळ १२) पालनपोषण करणारे; एक पालेभाजी १४) वेगाने वाहणारी हवा; पवन १५) गवळ्याची बायको १६) फळातील रसाळ भाग; गर १७) काख १८) मोठा; शक्तिमान; जास्त १९) वरवंट्याचे चटणी वगैरे ज्यावर वाटतात तो पसरट दगड

### शब्दगंध क्र. ७५२८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | त | रं | जी | ■ | दि | व | स |
| म | ल | ■ | व | ड | वा | न | ल |
| र | म | जा | न | ■ | क | ■ | वा |
| भू | ■ | ग | ■ | आ | र | मा | र |
| मी | ठ | ■ | पा | रा | ■ | न | ■ |
| ■ | रा | जा | रा | म | ■ | व | ग |
| र | वि | ■ | श | ■ | स | ता | ड |
| वा | क | ■ | र | क्ष | क | ■ | द |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** नशीब कधीच सोबत नसते मात्र कष्ट करणाऱ्याच्या मागे नशीबाला धावावेच लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### तांब्याच्या भांड्यातील पाणी का प्यावे? याबद्दल विज्ञान काय सांगते?

तांबे हा नैसर्गिकरित्या अँटीबॅक्टेरियल धातू आहे, याला ऑलिगोडायनामिक इफेक्ट म्हणतात. जेव्हा पाणी ६ ते ८ तास तांब्याच्या भांड्यात राहते तेव्हा तांब्याचे सूक्ष्म आयन पाण्यात मिसळतात आणि हे आयन बॅक्टेरियाच्या पेशी भित्तिकेला नष्ट करतात, त्यामुळे काही जिवाणू कमी होतात, याच कारणामुळे पूर्वीच्या काळी जेव्हा फिल्टर नव्हते तेव्हा तांब्याचे भांडे उपयोगी पडायचे. पण याचा अर्थ पाणी १००% शुद्ध होते असा होत नाही. तांबे व्हायरस, केमिकल, जड धातू किंवा गढूळपणा काढू शकत नाही, आणि आजच्या ठज आणि णत फिल्टरच्या तुलनेत त्याची क्षमता खूपच कमी आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तांबे प्रमाणापेक्षा जास्त शरीरात गेले तर ते विषारी ठरते, दिवसभर तांब्याच्या भांड्यातीलच पाणी प्यायल्याने मळमळ, पोटदुखी आणि दीर्घकाळाने लिव्हरवर परिणाम होऊ शकतो. आयुर्वेदात ताम्रजल सांगितले आहे पण तिथेही सकाळी एक ग्लास आणि भांडे आतून कल्हई केलेले नसावे, घासून स्वच्छ केलेले असावे असे सांगितले आहे. आंबट पदार्थ जसे लिंबू पाणी, ताक कधीही तांब्याच्या भांड्यात ठेवू नये कारण ॲसिडमुळे जास्त तांबे विरघळते. त्यामुळे थोडक्यात सांगायचे तर तांब्याचे पाणी थोडे जंतूरहित होते पण ते पूर्ण शुद्ध पाणी नाही, फिल्टरचे पाणी सकाळी एकदा तांब्याच्या स्वच्छ भांड्यात ठेवून प्यायले तर ठीक आहे पण दिवसभर त्याच भांड्यावर अवलंबून राहणे विज्ञानाच्या दृष्टीने योग्य नाही.

### एक होता की-बोर्ड

एक होता लेखक. त्याच्याकडे दोन की-बोर्ड होते. एक जुना, घाण झालेला, काही बटणे निघालेली. दुसरा अगदी नवीन, लाईट लागणारा, महागडा मेकॅनिकल की-बोर्ड. लेखक रोज नवीन की-बोर्डकडे बघायचा, पुसायचा, फोटो काढून स्टेटसला ठेवायचा पण टायपिंग करायला घाबरायचा. म्हणे याला ठसा पडेल, खराब होईल. आणि जुन्या की-बोर्डवर तो रागाने आपटायचा, चहा सांडायचा, कधी साफही करायचा नाही.

एक दिवस अचानक जुन्या की-बोर्डची एक कळ दाबली गेली आणि तो बंद पडला. लेखक घाबरला, आता नवीन की-बोर्ड वापरावा लागेल म्हणून त्याने तो लावला.

पण गंमत अशी झाली की महिने न वापरल्याने नवीन की-बोर्डच्या आत धूळ बसली होती आणि त्याचे सर्किट गंजले होते. तोही चालेना. तेव्हा दुकानदार म्हणाला – वस्तू वापराने नाही तर न वापरल्याने जास्त खराब होते.

तात्पर्य – आपल्याकडे असलेले ज्ञान, नाती आणि संधी या की-बोर्ड सारख्याच असतात. जपून ठेवण्याच्या नादात वापरलीच नाहीत तर त्या गंजून जातात.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

गुरु ग्रंथसाहेबात म्हटले आहे, फरिदा जा लबु ता नेहु किआ लबु त कूडा नेहु।। (लोभावर आधारित प्रेम कसे असेल? जेथे लोभ असेल तेथे प्रेम खोटे असेल.) (सलोक फरिद पृ. १३७८) संत कृपालसिंहजी महाराज म्हणतात की, प्रेम फक्त देणेच जाणते. जेव्हा आम्हाला लोभ सुटतो तेव्हा फक्त घेणेच आम्हाला सुचते. जेव्हा आत्म्याची हाक ऐकू येते तेव्हा इतरांबरोबर जीवन जगणेच आम्हाला पसंत होते. जेव्हा दुसऱ्यांसाठी आम्ही आमचे बाहू पसरतो तेव्हा आम्ही परमेश्वरासाठी दरवाजा उघडीत असतो.

वासना अडथळा कशी बनते? शारीरिक इच्छा म्हणजे वासना. आम्ही फक्त यौवनसुलभ सुख म्हणजे वासना समजतो. परंतु पंचज्ञानेन्द्रियांच्या क्रियांमुळेही ही वासना प्रगट होते जसे पाहण्यात, ऐकण्यात, वास घेण्यात, चव घेण्यात तसेच स्पर्शसुख. अशा अनेक रुपात वासना प्रकटते. आमच्या प्रत्येक इंद्रियाची दोन कामे आहेत.

एक म्हणजे बाह्य जगाची माहिती घेऊन ती मेंदूस पोहचविणे व दुसरे म्हणजे त्या सांसारिक सुखाचा आनंद अनुभपणे.आमचे डोळे जगात जाण्या-येण्यासाठी, आपल्या कामाची वस्तू शोधण्यासाठी आणि धोक्याच्या वेळी सावध होण्यात उपयोगी पडतात.

ते सौंदर्य दर्शन करतात. तसेच कला, आश्चर्यकारक निसर्ग आणि आकर्षक चेहरे पाहण्याकडे ते आकर्षित होतात. आम्ही जेव्हा ह्या वस्तू पाहण्यात दंग होतो तेव्हा आम्हाला आपल्या आत्म्याची आठवण राहत नाही व मग आम्ही वासनेच्या आहारी जातो.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : मला एकाने सुविचार पाठवला. तो असा – 'पालक म्हणून तुमची वृत्ती कशी आहे हेच मुलं शिकणार आहेत. तुम्ही काय शिकवता ते मुलं लक्षात ठेवत नाहीत तर तुम्ही कसे आहात ते मुलं लक्षात ठेवतात.'शिवानीदीदी : खूप सुंदर!सुरेश ओबेरॉय : मी अजून एक सुविचार सांगतो – 'तुमची मुलं तुमचं ऐकत नाहीत म्हणून काळजी करू नका, ते तुम्हाला सतत बघत आहेत याची काळजी करा.'शिवानीदीदी : या दोन विचारांमध्ये आपण आतापर्यंत जी चर्चा केली त्याचं सार आहे. आपण लोकांना काय सांगितलं हे त्यांच्या लक्षात राहीलच असं नाही. आपण मुलांना लहान वयातच चूक-बरोबर शिकवायला लागतो त्या मुलांच्या बाबतीत तर हे अगदीच सत्य आहे. या वयात मुलं संवेदनशील आणि स्वागतशील असतात. सुविचार असं सांगतो – 'तुमची मुलं तुमचं ऐकत नाहीत म्हणून काळजी करू नका तर ती तुम्हाला सतत बघत आहेत याची काळजी करा.' या सुविचारात अजून एका वाक्याची भर घालू या, – 'सर्वांत महत्त्वाचं म्हणजे मुलं नेहमी तुमच्या आजूबाजूला आहेत.' भलेही ते बघू शकणार नाहीत असं काही तुम्ही करत असाल तरीही तुमची स्पंदनं नक्कीच त्यांच्यापर्यंत पोहोचत आहेत.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र १ : अरे तुझ्या हातावर तीळ आहे, याचा अर्थ तू खूप नशीबवान आहेस.

मित्र २ : नशीबवान कसला, सकाळपासून बायकोला याच हाताने ४ वेळा भाजी आणून दिली आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'हिंद स्वराज्य' हे पुस्तक कोणी लिहिले?

– महात्मा गांधी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'आपला अमिताभ बच्चन...

१९६० ते १९७० च्या दशकात जन्मलेल्या व्यक्ती सदी का महानायक, बीग बी, शहेनशहा अमिताभ बच्चन ह्यांचे चित्रपट पाहात मोठ्या झाल्या आहेत. त्याकाळी मनोरंजनाचं सर्वात महत्वाचं माध्यम चित्रपट. मोबाईल, सोशल मिडिया हा प्रकार अस्तित्वात नव्हता. त्यामुळे अमिताभ बच्चनचे चित्रपट हाऊसफुल्ल असायचे. साधारण दोन किंवा तीन रुपये तिकिट दर असायचा. त्याकाळी रु.२/- चे तिकिट जवळपास तिप्पट ते चौपट किंमतीला ब्लॅकमध्ये जायचं. बाल्कनीतुन अभिताभचे चित्रपट पाहायचा आनंदच वेगळा. अमिताभची मोठ्या पडद्यावर एंट्री झाली की टाळ्या, शिट्ट्या चित्रपटगृहात ऐकु यायच्या. जंजीरम धला अँग्री यंग मॅन, दिवार, मुकद्दर का सिकंदर, काला पत्थर, दोस्ताना, आनंद, लावारिस... शेकडो चित्रपटांमध्ये अमिताभने भूमिका केल्या आहेत. आजही अमिताभ बच्चनचा चित्रपट पाहणारा चाहता वर्ग आहे. पुढील रविवारी अमिताभ ८५ व्या वर्षात पदार्पण करणार आहे. आजही अमिताभ बच्चनच्या चित्रपटातील अनेक डायलॉग अनेक चाहत्यांचे पाठ आहेत. – मैं आज भी फेके हुए पैसे नही ऊठाता, डॉन को पकडना मुश्किलही नही नामुन्कीन है, हम जहाँ खडे होते है लाईन वहीसे शुरु होती है, पीटर तुम मुझे ढूंढ रहे हों और मैं यहा तुम्हारा इंतजार कर रहा हुँ, रिश्ते में' तो हम तुम्हारे बाप लगते है, मुच्छे हो तो नथ्थुलालकी जैसी हो...' अमिताभ बच्चन इतकी प्रसिध्दी, प्रेम कदाचित आणखी एखाद्या अभिनेत्याला मिळालं असेल.

अमिताभविषयी मी केलेलं वाचन, पाहिलेले चित्रपट, कौन बनेगा करोडपती मालिकेचे पाहिलेले अनेक भाग ह्यातुन लक्षात आलं की अमिताभ बच्चन आजही कार्यरत का आहे? आजही त्यांच्याकडे पाहुन चित्रपट का लिहिले जात आहेत? तेव्हा माझ्या लक्षात आलं की वक्तशीरपणा हा अमिताभ बच्चनचा अत्यंत महत्वाचा गुण. आजही आपला अमिताभ बच्चन शुटिंगच्या ठिकाणी सांगितलेल्या वेळेच्या आधी उपस्थित असतात. जुन्या काळातील कलाकार आजही म्हणतात अमिताभ बच्चनने वेळेचा दररोज आदर केला आहे म्हणूनच वेळेनीही अभिताभची कदर केली आहे. साधारण वर्षभरापूर्वी अमिताभ बच्चनची व्हॅनिटी व्हॅन ट्रॅफिक मध्ये अडकली. शुटिंगचं ठिकाणी आणि वेळ जवळ आलेली. ते अस्वस्थ होऊ लागला. कारण आता वेळेवर पोहोचता येणार नाही. ते व्हॅनिटीमधुन उतरले. एका टु व्हिलरवाल्याला लिफ्ट मागितली आणि ते वेळेच्या आधी शुटिंग लोकेशनला पोहचले. काही गोष्टी रक्तातच असाव्या लागतात त्याशिवाय आपली प्रगती होऊच शकत नाही. फारपूर्वी अमिताभ बच्चनची व्हॅनिटी शुटिंग लोकेशनला पोहोचली की काही व्यक्ती घड्याळात टाईम सेट करुन घ्यायच्या. वेळेशी किती प्रामाणिक असावं ह्याचं मुर्तिमंत उदाहरण आहे महानायक.

अमिताभ बच्चनचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे हिंदी भाषेवर असणारं प्रभुत्व. 'केबीसी' कार्यक्रम पाहतांना हे प्रकर्षाने लक्षात येतं. प्रभुत्व मिळवणं सोपं नसतं. प्रेम, ममत्व, चिकाटी आणि मनापासूनचा प्रयत्न हे प्रभुत्व मिळवण्यासाठी नक्कीच आवश्यक आहे. अमिताभ ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे अत्यंत तेजस्वी किंवा ज्याचे तेज किंवा आभा अमर्याद आहे. 'खऱ्या अर्थाने आपलं नाव सार्थ ठरवणारा आपला बीग बी, महानायक अमिताभ बच्चन. अमिताभ ह्यांच्या विषयी वाचन केल्यावर अनेक गोष्टी, त्यांच्यापासून शिकण्यासारख्या आहेत. त्यापैकी एक गोष्ट मी शिकलो ती म्हणजे वक्तशीरपणा, वेळेचा आदर करणं. २००२ सालापासून मी कथाकथन आणि २०१५ सालापासून मी 'सुयशमार्ग' – प्रेरणादायी संवाद व्याख्यान देतो आहे. ज्या शाळा, कॉलेज, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव मंडळांमध्ये, क्लासेसमध्ये ज्यावेळी बोलावले त्या ठरलेल्या वेळेच्या किमान दहा मिनीटे आधी उपस्थित राहातो. व्याख्यानांमध्ये मी २०१५ सालापासून अभिता बच्चन ह्यांच्या वक्तशीरपणाविषयी उपस्थितांना सांगतो. अमिताभ होण्याचा प्रयत्न करणं नक्कीच आपल्या हातात आहे. जे क्षेत्र आपण निवडणार आहात अथवा निवडलेलं आहे त्या क्षेत्रातला अमिताभ होण्याचा प्रयत्न करणं सर्वस्वी आपल्या हातात आहे. मी लेखन क्षेत्र निवडलं आहे. लेखनातला अमिताभ होण्याचा माझा प्रयत्न सातत्याने ३५ वर्षांहून अधिक काळापासून चालुच आहे. तो अखेरच्या श्वासापर्यंत चालणारच आहे कारण अमिताभ होणं सोपं नसतं हे आज ८४ वर्षांच्या अमिताभकडे पाहिल्यावर लक्षात येतं. आपला अमिताभ बच्चन काल आणि आजही अँग्रीयंग मॅन आहेच. आज अमिताभचा एखादा चित्रपट पाहुया. अमिताभ आपल्यामध्ये उतरवण्याचा प्रवास सुरु करुया. महानायकाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करुया.

(लेख क्र.६२०)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

मासिक पाळीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी उपाशी पोटी ही तपासणी करतात. तपासणी करण्याआधी काहीही खाऊ नये. डॉक्टरांकडे गेल्यावर दांपत्याने आपले वय, व्यवसाय, पूर्वी झालेले आजार, व्यसन यांची माहिती द्यावी. शारीरिक तपासणीमध्ये रक्तदाब, श्वसनसंस्था, जननेंद्रियाची तपासणी करून 'जंतूसंसर्ग' आहे का हे बघतात. तसेच दांपत्याला पूर्वी क्षय, गालगुंड असे आजार झाले आहेत का, घरामध्ये किंवा शेजारी कुत्रा, मांजर असे प्राणी पाळले आहेत का याची डॉक्टर विचारणा करतात.लॅप्रोस्कोपी तपासणी :यामध्ये दुर्बिणीद्वारे गर्भाशयाची तपासणी होते. लॅप्रोस्कोपी केल्यानंतर काही रुग्णांमध्ये आश्चर्यकारकरित्या २-३ महिन्यातच गर्भधारणा होते, कारण लॅप्रोस्कोपीने वंध्यत्वाचे अचूकरित्या निदान होते. दोन्ही बीजवाहिनी नलिका बंद आहेत का? गर्भाशयाचा आकार प्राकृत आहे का? स्त्रीबीजकोशाला सूज आलेली आहे का? गर्भाशयाला क्षयरोगाची लागण झालेली आहे का? या सर्व कारणांचा शोध घेण्यासाठी दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करतात. शस्त्रक्रिया करताना याच्यासोबतच क्युरेटींग व हिस्टेरोस्कोपी करतात. हिस्टेरोस्कोपीमध्ये गर्भाशयाच्या आतील भागाची रचना समजते. गर्भाशयाला आतून पडदा आहे का?

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००





राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात शुक्रवारी जिनेश्वरी अनुष्ठान पार पडले. हजारो महिलांनी यात सहभाग घेतला.

# तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल : प्रविणऋषीजी महाराज

## आनंदतीर्थ समवशरण येथे जिनेश्वरी अधिवेशन उत्साहात

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात शुक्रवारी जिनेश्वरी अनुष्ठान पार पडले. हजारो महिलांनी यात सहभाग घेतला. नगरसह महाराष्ट्र तसेच देशाच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी यात सहभाग घेतला. 'अहिल्यानगरकी गलियो में कमाल हो गया, सबको गुरू आनंद का दिदार हो गया', या गीताने परिसर दुमदुमला.

आनंदतीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., महासतीजी सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यालत झालेल्या जिनेश्वरी अधिवेशनास अयोध्येतील राम मंदिर ट्रस्टचे महा सचिव गोविंददेवगिरीजी महाराज यांच्यासह समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी उपस्थित होते. कमिटीच्या वतीने गोविंददेवगिरीजी महाराज यांचा सन्मान करण्यात आला.

प्रविण ऋषीजीमहाराज म्हणाले, जिज्ञासेतूनच नवीन ज्ञान प्राप्त होते. जंबूस्वामींनी सुधर्मा स्वामींना जिज्ञासेतून तीर्थंकर महावीर यांच्या विषयी माहिती विचारली आणि त्यानंतर सुधर्मा स्वामींनी त्यांच्या अनुभूतीतील भगवान महावीर यांचे सुंदर वर्णन केले. आज तीर्थंकरांची शक्ती येथे जिनेश्वरी अधिवेशनात दिसून येत आहे. तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल. महासागरातून आपण पाणी घेऊ शकत नाही तर त्यात सागराचा दोष नाही. आपल्याला आपली झोळी मजबूत करायची यासाठी हे अनुष्ठान आहे. आग्रह सोडला तरच अनुग्रह होईल. आयुष्यात फक्त परमात्म्याचे गुणगान केले पाहिजे. आपल्याकडे तीर्थंकरांची अद्भुत वाणी आहे. ऊर्जा आहे. फक्त त्यांचेच गुणगान व्हावे. जगाला जिनेश्वरीचे भक्त बनवायचे आहे.

गोविंददेवगिरीजी महाराज म्हणाले की, आज याठिकाणी मला गुरू देवांचे मंगल आशिर्वचन प्राप्त झाले आहे. आचार्यश्रींचे अपार प्रेम मला प्राप्त झालेले आहे. ते आमच्या बेलापूर येथील घरी गोचरीसाठी यायचे, एवढे मोठे पुण्य आम्हाला लाभले. इथे जिनेश्वरी अनुष्ठान करणाऱ्या मातांना मी वंदन करतो. यातून पुढच्या पिढीला योग्य संस्कार मिळणार आहेत.

अशोक बाबूशेठ बोरा म्हणाले, गुरूदेवांच्या पावन भूमीत जिनेश्वरी ग्रुपचे अतिशय भव्य दिव्य अधिवेशन झाले आहे. आज इथले दृष्य पाहून केशरचा वर्षाव झाल्याची अनुभूती आली. कुंदनऋषीजी म.सा., प्रविणऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने हे शक्य झाले असून समर्पण चातुर्मास ऐतिहासिक ठरत आहे. आज गोविंददेवगिरीजी महाराज यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे. शेवटी मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## समस्येवर वेळीच मात करावी

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स




महर्षी व्यास म्हणतात, अनागत विधानाच प्रत्युत्पन्नम निश्चयः । दावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति ।।

तहान लागल्यावर विहीर खोदण्यात कुठला शहाणपणा? संकटाची चाहूल लागताच व्हावी उपाययोजना. असाच माणूस सुखाने जगतो. त्याचा तो सोबती होतो, की जो समस्या उभी होताच बुद्धी चालवितो. तत्काळ युक्ती योजतो आणि संकटातून मोकळा होतो. तिसरा बसतो विचार करीत, पुस्तके चाळीत, लोकांकडे मदत मागत. मग संकट करते त्याच्यावर मात. होतो सगळा घात.

पुष्कळ माणसे असतात अशी. त्यांच्या चेहऱ्यावरची नाही कधी उडत माशी. कपाळावर नेहमीच आठी. अजिबात हसणार नाहीत कधी. सदा दुःख बोलतील ते एकच, माझ्यापुढं समस्या उभी ।।

अशांचे वर्णन करताना तुकाराम महाराज म्हणतात. जगा घालावे साकडे। दीन होऊनी बापुडे । हेचि अभाग्य रोकडे । मुळ आणि विश्वास । असे हे सदा समस्यांनी गांजलेले बुद्धी न चालल्याने भांबावलेले. जगाला म्हणतात, माझे एवढे काम करा हो. मला या संकटातून वाचवा हो. दुर्दैव हेच त्याच्या दुःखाचे मूळ. नाही स्वतःवर विश्वास, मग कठीण होणे घेणे श्वास. गळ्याला स्वतःच लावला फास. पण बा माणसा, तू एवढा नाश करूनही घेतोस आपल्या आयुष्याचा, तो समस्या उभी ठाकली म्हणून ना? पण ती समस्या एकदम का उभी झाली ? तिची आधीच पडते सावली. तेव्हाच करावी विचारपूर्वक योजना भली. पण गौतम बुद्ध विचारतात, अरे तू जिला समस्या समजतोस ती खरीच समस्या म्हणून काही नसतेच. माणूस ती करतो उभी. मन दुबळे. धीर नाही. उतावीळपणा मात्र कमालीचा, मग सगळ्यांना काय तोटा ? एका राजाने पकडून आणले तीन पंडितांना म्हणाला, या खोलीत करतो उद्या बंद तुम्हाला. आतून लावतो एक कुलूप आकड्याचे. बरोबर गणित जमले तरच कुलूप उघडेल.

दोघा पंडितांपुढे समस्या उभी राहिली. त्यांनी अनेक शास्त्रे धुंडाळली. आकड्यांची नानाप्रकारे जुळवाजुळव केली. तिसऱ्याने खोली आधीच नीट पाहून ठेवली. दुसऱ्या दिवशी दोघे अस्वस्थ पंडित आकडेमोड करीत बसले. तिसरा बाहेर पडून राजापुढे आला. तो म्हणाला, राजा ही काय समस्या होती? मागं बिनगजाची खिडकी. ती उघडून मी बाहेर मारली उडी. बाहेर पडणं ही समस्याच नव्हती. – **किशोर गांधी**

# अहिल्यानगर शहरामध्ये ६ ऑक्टोबर रोजी रंगणार 'गोल्डन मेलेडी'चा सूरमयी नजराणा, संगीत मैफल!




नगर – संगीतप्रेमींसाठी एक खास पर्वणी घेऊन वैदेही बल्लाळ यांची हार्मनी म्युझिक्स घेऊन येत आहेत 'गोल्डन मेलेडी' लाईव्ह म्यूझिक आर्केस्ट्रा भाग पहिला ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात ही संगीत मैफल पार पडणार आहे.

या कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर येथील गायक कुशलकुमार जैन आणि अनिरुद्ध वरणगावकर यांच्यासह अहिल्यानगरचे गुणी गायक देवदत्त पाऊलबुधे, सुमित वर्मा, निलेश महाजन, सारंग पंधाडे, महेश घावटे, मोहसीन सैफी, एस्तर पवार, विद्या तंन्वर आणि वैदेही बल्लाळ आपल्या बहारदार गायकीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतील.

संगीत संयोजक दीपक काळे यांच्या संगीताच्या तालावर दिलावर शेख, अमर वानखेडे, रितिक साटम, अमित बरुवा, हर्षद गणबोटे आणि सिद्धांत गायकवाड हे उत्कृष्ट वादक साथसंगत करणार आहेत.

कार्यक्रमाचे रसाळ आणि बहारदार निवेदन निवेदक प्रदीप कुलकर्णी करणार असून, पुणे येथील 'गौतम साऊंड लाईट'ची उत्तम ध्वनी आणि प्रकाश योजना या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन गायिका आणि निवेदिका वैदेही बल्लाळ आणि सहकाऱ्यांकडून करण्यात आले आहे. प्रवेशासाठी पास आवश्यक असुन अधिक माहितीसाठी व पासेससाठी ८४११८ ३९३८६ आणि ९२२६६२३५९८ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला 'सेवाप्रीत'चा आधार

## बालघरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व सायकलींची भेट



नगर – सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने शहरातील बालघर प्रकल्पातील वंचित व निराधार बालकांसाठी विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची किट भेट देण्यात आली. तसेच शाळेत जाण्यासाठी अडचण निर्माण होणाऱ्या दोन गरजू विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्या.

प्रकल्प प्रमुख निशा धुप्पड यांच्या पुढाकाराने हा सेवाभावी उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक साहित्य देणे एवढ्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता त्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शाळेत नियमित जाण्यासाठी सायकलची आवश्यकता असलेल्या दोन विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मोठी मदत मिळाली. यावेळी संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, ग्रुप लिडर अर्चना खंडेलवाल, सविता चड्ढा, गीता नय्यर, नताशा धुप्पड, गीता धुप्पड, अर्चना ओबेरॉय, संगीता बट, संगीता जग्गी, बाबो धुप्पड, वीणा खुराणा, रीटा बक्षी, शबनम धुप्पड, प्राची धुप्पड, तक्ष धुप्पड, कमलेश पंजाबी, रेखा वाही आदी महिला सदस्य उपस्थित होत्या.

या उपक्रमादरम्यान ४० विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचा समावेश असलेल्या किटचे वाटप करण्यात आले. त्यानंतर बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांसाठी पावभाजी व पुलावाच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन अशा प्रकारे मदतीचा हात देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बालघर प्रकल्पाच्या वतीने सेवाप्रीतच्या महिला सदस्यांचे आभार मानण्यात आले.

# अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या वाद-विवाद स्पर्धेत चैताली चौगुलेने पटकाविले प्रथम क्रमांकाचे बक्षीस

## 'सामाजिक माध्यमे विद्यार्थ्यांसाठी गरजेची की घातक?'




अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या वाद-विवाद स्पर्धेत चैताली चौगुलेने पटकाविले प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकाविले.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये हिंदी दिनाचे औचित्य साधून वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक व अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत कार्यवाह अशोकभाऊ फिरोदिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या स्पर्धेला शहरातील विविध विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या सभागृहात झालेल्या स्पर्धेचे उद्घाटन स्व. अशोकभाऊ फिरोदिया व स्व. शांतीकुमार फिरोदिया यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे परीक्षक व प्रमुख पाहुणे डॉ. पूर्णिमा बेहेरे व रवींद्र चोभे, प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्या कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, उच्च प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, प्राथमिक विभाग प्रमुख अर्चना मुंडिवाले, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

विद्यालयाच्या संगीत शिक्षिका रेणुका पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.

प्राचार्य प्रभाकर भाबड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

हिंदी विषयाच्या अध्यापिका उन्नती नगरकर यांनी परीक्षकांचा परिचय करून दिला.

डॉ. पूर्णिमा बेहेरे यांनी वाद-विवाद स्पर्धेत सहभागी होताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे, तसेच आपले विचार प्रभावीपणे कसे मांडावेत, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आसिफ शेख यांनी वाद-विवाद स्पर्धेचे नियम व स्पर्धेची माहिती दिली.

'सामाजिक माध्यम वेदिका विद्यालयीन छात्रो के लिए जरूरी है या नही?' या विषयावर विविध विद्यालयांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. सामाजिक माध्यमांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान, त्याचे फायदे-तोटे, शैक्षणिक वापर तसेच त्याचे संभाव्य दुष्परिणाम अशा विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

रवींद्र चोभे यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले. प्रभावी वक्तव्य करताना विषयाची मांडणी, भाषेचा वापर, आत्मविश्वास आणि वेळेचे नियोजन याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी सामाजिक माध्यमांचा वापर करताना सजग राहण्याची गरज व्यक्त करत त्याच्या दुष्परिणामांची माहिती दिली.

स्पर्धा संपल्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ घेण्यात आला. आसिफ शेख यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला. विजेत्या विद्यार्थ्यांचे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, संस्थेचे सदस्य, प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्या, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती हिंगे यांनी केले, तर अनिता वायकर यांनी आभार मानले.

वाद-विवाद स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :- प्रथम- चैताली चौगुले (सेठ नंदलाल धूत विद्यालय), द्वितीय- राधा जाट (पंडित नेहरू हिंदी विद्यालय), तृतीय- आर्यन उगले (श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल) उत्तेजनार्थ- वेदांती पालवे (भाऊसाहेब फिरोदिया स्कूल) व शिवानी मोरे (सेठ नंदलाल धूत)



किरण पवार टेबल टेनिस कडमीतील तृतीय क्रमांक पटकाविलेले खेळाडू व एन.आय.एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योग शिक्षक किरण पवार यांचे मार्गदर्शन मिळाले.

# किरण पवार टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंची विभागीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

नगर – ३० सप्टेंबर व १ ऑक्टोंबर दरम्यान बालेवाडी स्टेडियम, पुणे येथे पार पडलेल्या विभागीय टेबल टेनिस शालेय स्पर्धेत किरण पवार टेबल टेनिस अक्ॅडमीच्या खेळाडूंनी १४ वर्षे वयोगटात तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, पिंपरी चिंचवड येथील खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे–१४ वर्षे वयोगट मुली– या संघात स्पृहा वैद्य, ह्रिदया भंडारे, आद्या खरमाळे, साची क्षीरसागर ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल यांच्या संघाने सोलापूर संघावर ३–१ असा विजय मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. १४ वर्षे वयोगट मुले– या संघात रिदान सारडा, समदर्श पुरसवाणी व विहान भगत कर्नल परब स्कूल यांच्या संघाने पिंपरी चिंचवड व सोलापूर संघाबरोबर ३–१ असा विजय मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेत रिदान सारडा व स्पृहा वैद्य यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. याचबरोबर मिनसा तांबटकर, निरवी देवळालीकर, प्रणिल थिगळे, अद्रिक दरंदले, प्रज्ञा अलचेट्टी तसेच १७ वर्षे वयोगटात अनुवेद गाडेकर, अब्दुल तांबटकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

वरील खेळाडूंना ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलचे क्रीडा शिक्षक मयुर टेमक व कर्नल परब स्कूलचे सौरभ सानप तसेच एन.आय.एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योग शिक्षक किरण पवार यांनी मार्गदर्शन केले.

# स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीतर्फे ४ ऑक्टोबरला भिंगार येथे रक्तदान शिबीर

भिंगार – स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीने ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते २ वाजेपर्यन्त देशमुख सांस्कृतिक हॉल खळेवाडी भिंगार येथे रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. शिबिराचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. रक्तदात्यांनी रक्तदान करुन रुग्ण सेवेच्या कार्यास सहकार्य करावे असे आवाहन प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी केले आहे.

नगरच्या जनकल्याण रक्तपिढीच्या सहकार्याने संस्थेने आजपर्यंतच्या २४ रक्तदान शिबिरांमधून २ हजार ८९२ रक्तपिशवी संकलन केले आहे, अशी माहिती कार्याध्यक्ष रुपेश भंडारी यांनी दिली.

रक्तदान करण्यासाठी वय १८ ते ६५ असावे, वजन ५० किलो पेक्षा जास्त आणि हिमोग्लोबिन १२:५ पेक्षा जास्त असावे. रक्तदात्याने एकदा रक्तदान केले की तो तीन महिन्यानंतर रक्तदान करु शकतो. शरीरात नवं रक्त तयार होत. त्यास अधिक फ्रेश वाटत. हृदयविकाराचा धोका कमी होतो. अपघातातील जखमी, कॅन्सर, थॅलेसेमिया रुग्ण, प्रसुती, मोठी शस्त्रक्रिया यासाठी रक्ताची गरज असते. आपण केलेले रक्तदान तीन रुग्णांचा जीव वाचवू शकते. रक्ताचा कारखाना नसल्याने फक्त माणूसच रक्त देवू शकतो. म्हणूनच रक्तदान हे महान दान म्हटले आहे. कोणताही आजार असल्यास रक्तदान करु नये. शिबीरस्थळी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. आपण निरपेक्ष भावनेने स्वच्छेने रक्तदान करावे.

रक्तदान शिबीर संयोजक सुनील तरवडे, उपाध्यक्ष रमेश वराडे, सचिव शिवप्रसाद काळे, खजिनदार रितेश फिरोदिया आणि संचालक रवींद्र जाजू, राम घुले, सुधीर कुलट, गोरक्षनाथ वामन, दत्तात्रय चिपाडे, संजय शिंदे, सचिन कस्तुरे, सौ. संगीता देऊळगावकर, डॉ.सौ. वर्षाताई किर्तने शिबिरासाठी अथक प्रयत्न करीत आहेत.

# 'संस्कार भारती'तर्फे ४ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेचे आयोजन

नगर – ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, शंकर पाटील आणि व्यंकटेश माडगूळकर या साहित्यिकांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संस्कार भारती, अहिल्यानगर समितीतर्फे ४ ऑक्टोबर रोजी 'कथाकथी २६' या जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा नगरमधील दादा चौधरी विद्यालयात सकाळी ९ वाजता होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सचिव स्नेहल झांबरे यांनी दिली.

अधिक माहिती देताना उपक्रम प्रमुख तेजस अतितकर म्हणाले, ही स्पर्धा आंतरशालेय गट वय वर्षे १२ ते १७ व खुला गट वय वर्षे १८ च्या पुढील आशा दोन गटांमध्ये होणार आहे. आंतरशालेय गटात कथा कथनासाठी ५ ते ७ मिनिटांची वेळ दिली जाईल. या गटातील विजेत्यांना सर्वोत्कृष्ट:रुपये १००० रोख व प्रमाणपत्र, उत्कृष्ट:रुपये ७५० रोख व प्रमाणपत्र, उत्तम:रुपये ५०० रोख व प्रमाणपत्र, प्रशंसनीय:रुपये २५० रोख व प्रमाणपत्र तसेच परीक्षक शिफारस प्रमाणपत्र या प्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

खुल्या गटात कथा कथनासाठी १५ ते २० मिनिटांची वेळ असेल. या गटातील विजेत्यांना सर्वोत्कृष्ट:रुपये ३००० रोख व प्रमाणपत्र, उत्कृष्ट:रुपये २००० रोख व प्रमाणपत्र, उत्तम:रुपये १००० रोख व प्रमाणपत्र, प्रशंसनीय:रुपये ५०० रोख व प्रमाणपत्र तसेच परीक्षक शिफारस प्रमाणपत्र या प्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

खुल्या गटात वैयक्तिक अथवा समूह भाग घेऊ शकतो. समूह म्हणून जास्तीत जास्त ४ कथाकार व १ तंत्रज्ञ असावा. कथेच्या आवश्यकतेनुसार सादरीकरणात पार्श्वसंगीत, रंगभूषा, वेशभूषा यांचा वापर करता येईल. विशेष म्हणजे खुल्या गटातील सर्वोत्कृष्ट (विजेत्या) स्पर्धकाची किंवा संघाची १५ ऑक्टोबर रोजी पुण्यात होणाऱ्या राज्यस्तरीय महाअंतिम फेरीसाठी निवड होईल, असे अहिल्यानगर समिती अध्यक्ष ॲड. दीपक शर्मा यांनी सांगितले.

कथाकथी २६ ही स्पर्धा ज्येष्ठ साहित्यिक शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर आणि द. मा. मिरासदार यांच्या जन्म शताब्दी निमित्त असल्याने त्यांच्या कथाकथनास प्राधान्य दिले जाईल. परंतु स्पर्धक इतर साहित्यिकांच्या अथवा स्वलिखित कथा सुद्धा सादर करू शकतात. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी तेजस अतितकर मो.नं ८६००००७९९७, तन्मयी भावे मो.नं ९८६०००५२०० यांच्याशी ३० सप्टेंबर पर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन समिती तर्फे करण्यात आले आहे.

# भूकंपरोधक घरांची गरज काय आहे?

## घर सुंदर असावं, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे ते सुरक्षित असावं

घर बांधताना आपण खूप गोष्टींचा विचार करतो. हॉल किती मोठा असावा, किचन कुठे असावं, टाइल्स कोणत्या घ्यायच्या, रंग कसा असावा, elevation कसं दिसावं, अशा अनेक गोष्टींवर आपण वेळ आणि पैसा खर्च करतो.

**पण एक प्रश्न आपण स्वतःला विचारतो का?**

**भूकंप आला तर हे घर सुरक्षित राहील का?**



















हा प्रश्न फक्त भूकंप जास्त होणाऱ्या भागांसाठी नाही. घर कुठेही असो, त्याची रचना सुरक्षित असणं गरजेचं आहे.

भूकंप घर पाडत नाही, कमकुवत बांधकाम पाडतं भूकंप आला म्हणजे प्रत्येक इमारत पडते, असं नाही. एकाच भागात काही इमारती सुरक्षित राहतात, तर काही इमारतींना मोठं नुकसान होतं. याचं कारण म्हणजे प्रत्येक इमारतीचं डिझाईन, बांधकाम आणि वापरलेलं साहित्य वेगळं असतं. भूकंपापेक्षा कमकुवत बांधकाम जास्त धोकादायक असतं.

### भूकंपाच्या वेळी घराचं काय होतं?

सामान्य वेळी घरावर त्याचं स्वतःचं वजन, माणसं, फर्निचर, पाण्याची टाकी आणि इतर वस्तूंचं वजन असतं. पण भूकंपाच्या वेळी जमीन हलते. त्यामुळे घराला फक्त वरून खाली वजन सहन करायचं नसतं, तर बाजूनेही जोर बसतो. यामुळे घर हलतं, वाकतं आणि काही भागांवर जास्त ताण येतो. जर बीम, कॉलम, फाउंडेशन आणि त्यांचं एकमेकांशी जोडणं योग्य नसेल, तर नुकसान वाढू शकतं. भूकंपात घरावर फक्त वजन नाही, तर आडव्या शक्तीही काम करतात सामान्य परिस्थिती घरावर उभ्या दिशेचे (वजनाचे) भार काम करतात. भूकंपाच्या वेळी आडव्या दिशेच्या शक्ती (भूकंपीय बल) घरावर काम करतात.

### भूकंपरोधक घर म्हणजे काय?

भूकंपरोधक घर म्हणजे भरपूर स्टील टाकलेलं किंवा खूप जाड कॉलम असलेलं घर नव्हे. खरं भूकंपरोधक घर म्हणजे योग्य प्लॅन, योग्य डिझाईन आणि साइटवर योग्य काम झालेलं घर.

* योग्य जागी कॉलम आणि बीम
* मजबूत व योग्य फाउंडेशन
* चांगल्या दर्जाचं काँक्रीट आणि स्टील
* स्टीलचं योग्य detailing
* डिझाईनप्रमाणे साइटवर अंमलबजावणी

जास्त साहित्य म्हणजे सुरक्षित बांधकाम नाही. योग्य साहित्य योग्य जागी वापरणं म्हणजे सुरक्षित बांधकाम. घर सुंदर दिसतं, पण त्याची ताकद दिसत नाही. आपल्याला बाहेरून elevation दिसतं, रंग दिसतो, काचा दिसतात आणि टाईल्स् दिसतात. पण घराची खरी ताकद बीममध्ये, कॉलममध्ये, स्टीलमध्ये, फाउंडेशनमध्ये आणि या सर्वांच्या योग्य जोडणीत असते. ही ताकद घर पूर्ण झाल्यानंतर दिसत नाही. म्हणून बांधकामाच्या वेळेसच ती व्यवस्थित करणं खूप महत्त्वाचं असतं.

सौंदर्य डोळ्यांना दिसतं, सुरक्षितता संरचनेत दडलेली असते

### भूकंपरोधक डिझाईन म्हणजे घराला काहीच होणार नाही का?

नाही. मोठा भूकंप झाला तर घराला तडे जाऊ शकतात. काही भागांना नुकसानही होऊ शकतं. पण चांगल्या भूकंपरोधक डिझाईनचा मुख्य उद्देश असा असतो की घर अचानक कोसळू नये आणि घरातील लोकांना सुरक्षित बाहेर पडायला वेळ मिळावा. माणसांचा जीव वाचवणं हा सर्वात महत्त्वाचा उद्देश असतो.

### भूकंपरोधक घर खूप महाग पडतं का?

अनेक घरमालकांना ही भीती असते. पण सुरुवातीपासून योग्य डिझाईन केलं, साइटवर योग्य काम केलं आणि नंतर मनाने बदल केले नाहीत, तर खर्च फार मोठ्या प्रमाणात वाढेलच असं नाही.

उलट चुकीचं बांधकाम झाल्यावर repair किंवा strengthening करावी लागली, तर जास्त पैसे खर्च होतात. म्हणून सुरुवातीलाच चांगल्या इंजिनिअर कडून डिझाईन करून घेणं हा खर्च नसून सुरक्षिततेसाठी केलेली योग्य गुंतवणूक आहे.

### साइटवर कोणत्या चुका टाळायला हव्यात?

कागदावरचं डिझाईन कितीही चांगलं असलं, तरी साईटवर काम चुकीचं झालं तर त्याचा उपयोग कमी होतो. काही सामान्य चुका अशा असतात :–

* drawing न पाहता काम करणं
* स्टील कमी–जास्त करणं
* stirrups जास्त अंतरावर ठेवणं
* lap चुकीच्या ठिकाणी देणं
* beam-column joint मध्ये detailing बिघडवणं concrete नीट compact न करणं
* column किंवा beam चा आकार मनाने बदलणं
* वरचा मजला वाढवताना structural check न करणं

या चुका सुरुवातीला छोट्या वाटतात. पण भूकंपाच्या वेळी त्या गंभीर ठरू शकतात.

### स्ट्रक्चरल इंजिनिअर का आवश्यक आहे?

घर बांधताना फक्त contractor किंवा mason चा अनुभव पुरेसा नसतो. Structural engineer घराचं पूर्ण structure विचारात

* वजन कुठून कुठे जातं
* भूकंपाच्या वेळी घर कसं हलू शकतं
* कोणत्या भागावर जास्त ताण येईल
* कॉलम आणि बीम कुठे असावेत
* foundation कसं असावं
* स्टीलचं detailing कसं असावं

म्हणून structural engineer फक्त drawing देत नाही. तो घर सुरक्षित कसं राहील याचा विचार करतो.

### जुन्या घरांचं काय?

हा विषय फक्त नवीन घरांसाठी नाही. जुन्या घरांमध्ये cracks असतील, अतिरिक्त मजला टाकलेला असेल, भिंती काढलेल्या असतील किंवा जुना RCC कमकुवत झाला असेल तर structural engineer कडून तपासणी करून घेणं योग्य ठरतं. गरज पडल्यास repair किंवा strengthening करता येतं.

### शेवटी एकच प्रश्न

घर म्हणजे फक्त बांधकाम नाही. ते आपल्या कुटुंबासाठी असतं. आपली अनेक वर्षांची कमाई त्यात गुंतलेली असते. म्हणून घर बांधताना फक्त घर कसं दिसेल? एवढाच विचार करू नका. त्यासोबत हा प्रश्नही विचारा:

### भूकंप आला तर माझं घर माझ्या कुटुंबाला सुरक्षित ठेवेल का?

**निष्कर्ष :** भूकंपरोधक घर ही चैनीची गोष्ट नाही. योग्य डिझाईन, योग्य detailing, चांगलं साहित्य, योग्य supervision आणि अनुभवी engineer यांच्या मदतीने घर अधिक सुरक्षित बनवता येतं. भूकंप टाळता येत नाही. पण भूकंपातील नुकसान नक्कीच कमी करता येतं. भूकंपरोधक घर ही प्रत्येक घराची गरज आहे.

**लेखक : इंजि. सलिम मासूम शेख**



(My Bhoomi Consultants)
B.E. Civil, M- Tech Structures
Chartered Engineer,
MISSE, MIE, MIV
Cell No. - 8888227786
Off : Durga Residency,
Savedi, In front of
Yashodanagar Kaman,
Ahilyanagar.
Contact : 7721000042.

Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar



भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र रोहन कुटे देताना ना. राधाकृष्ण विखे, अनिल मोहिते आदी.

# भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी रोहन कुटे

नगर – भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी रोहन भास्कर कुटे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते त्यांना अधिकृत नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते पाटील यांच्या सूचनेनुसार आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. रुद्रेश भाऊसाहेब अंबाडे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती करण्यात आली. रोहन कुटे यांनी सिव्हिल इंजिनिअरिंग पर्यंतचे शिक्षण घेतले आहे.

या नियुक्तीबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे पाटील, जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते पाटील, युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आदिंनी अभिनंदन केले.



# राष्ट्रवादीच्या अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हा महासचिवपदी प्रा. युनुस शेख

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या अहिल्यानगर जिल्हा महासचिवपदी प्रा. युनुस शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार निलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी निवडीची घोषणा केली.

प्रा. युनुस शेख यांच्यावर पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच अल्पसंख्याक समाजातील विविध प्रश्न मांडण्यासाठी ते कार्यरत राहणार आहेत. नियुक्तीपत्र प्रदान करताना जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, शहर जिल्हाध्यक्ष अजहर शेख, तारिक कुरेशी, फरहान शेख, फारूक रंगरेज उपस्थित होते. प्रा. युनुस शेख हे शैक्षणिक चळवळीशी दीर्घकाळ जोडलेले असून, नुकतेच अहमदनगर जिल्हा उर्दू मुख्याध्यापक असोसिएशनच्या माध्यमातून अँग्लो उर्दू हायस्कूल, जामखेड येथील मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.

# अहिल्यानगर शहरामध्ये ४ ऑक्टोबर रोजी 'इंडिया खेलो फुटबॉल'ची विशेष निवड चाचणी

### १५ व १७ वर्षांखालील मुलांसह १७ वर्षांखालील मुलींना संधी; देशातील २० हून अधिक शहरांत निवड चाचणीत अहिल्यानगरचाही समावेश



नगर – फुटबॉल खेळाला प्रोत्साहन देत युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळावी, यासाठी 'इंडिया खेलो फुटबॉल' अंतर्गत अहिल्यानगरमध्ये ४ ऑक्टोबर रोजी विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून ही निवड चाचणी घेण्यात येणार असून, १५ व १७ वर्षांखालील मुलांसह १७ वर्षांखालील मुलींना यात सहभागी होता येणार आहे.

या निवड चाचणीतून गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या खेळाडूंना पुढील टप्प्यातील 'इंडिया खेलो फुटबॉल' प्री–फायनल स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. तसेच पुढे दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय फायनल स्पर्धेत खेळण्याची संधीही निवड झालेल्या खेळाडूंना मिळणार असल्याची माहिती नमोह फुटबॉल क्लबच्या नमिता फिरोदिया यांनी दिली.

अहिल्यानगरमध्ये फुटबॉलच्या प्रसारासाठी तसेच स्थानिक खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लब सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. क्लब हा 'इंडिया खेलो फुटबॉल' उपक्रमाचा विभागीय पार्टनर असून, या माध्यमातून नगरमधील युवा फुटबॉलपटूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भारतीय फुटबॉलचा दर्जा उंचावण्यासाठी देशभरातील २० हून अधिक शहरांमध्ये निवड चाचण्या घेण्यात येत आहेत. या उपक्रमामध्ये अहिल्यानगरचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नगर व परिसरातील युवा फुटबॉल खेळाडूंसाठी ही निवड चाचणी महत्त्वाची संधी ठरणार आहे. अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या निवड चाचणीत १७ वर्षांखालील मुले, १५ वर्षांखालील मुले तसेच १७ वर्षांखालील मुली सहभागी होऊ शकणार आहेत. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आपल्या खेळातील कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार असून, निवड प्रक्रियेतून पुढील स्तरासाठी पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. ही निवड चाचणी रविवारी अशोक भाऊसाहेब फिरोदिया स्कूलच्या फुटबॉल मैदानावर सकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर व परिसरातील इच्छुक युवा फुटबॉलपटूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने करण्यात आले आहे. निवड चाचणी व सहभागासंदर्भातील अधिक माहितीसाठी ८१४९१३०१२० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ऊस दराच्या प्रश्नावर ५ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

### अभिजीत पोटे यांच्या मागणीला यश; शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखानदारांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार

नगर – ऊस गाळप हंगाम २०२६–२७ सुरू करण्यापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली आहे. ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत पोटे यांच्या पाठपुराव्यानंतर ही बैठक होत असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य साखर आयुक्त यांच्या आदेशानुसार आणि जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीला शेतकरी प्रतिनिधी, साखर सहसंचालक, पोलीस अधीक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेष लेखापरीक्षक तसेच अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सहकारी व खासगी साखर कारखान्यांचे चेअरमन, कार्यकारी संचालक व जनरल मॅनेजर उपस्थित राहणार आहेत.



ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीचे निमंत्रण जिल्हाधिकारी यांना देताना शेतकरी प्रतिनिधी अभिजीत पोटे.



अहिल्यानगर शहरातील कराचीवालानगर परिसराचा 'अयोध्यानगर' असा नामकरण सोहळा स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, सौ. धनश्रीताई विखे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, सौ. शितलताई जगताप आदी.

# कराचीवालानगर परिसराचे 'अयोध्यानगर' नामकरण

नगर – अहिल्यानगर शहरालगत राधाबाई काळे महाविद्यालय परिसरातील कराचीवालानगर परिसराचा 'अयोध्यानगर' असा नामकरण सोहळा २ ऑक्टोबर रोजी स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते पार पडला. यावेळी रिबीन कापून नामकरण करण्यात आले. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, सौ. धनश्रीताई विखे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, सौ. शितलताई जगताप, नगरसेवक मोहित पंजाबी, नगरसेवक सौ. भारती भोसले, नगरसेवक हरप्रितकौर गंभीर यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सोहळ्यानिमित्त स्वामी गोविंद देवगिरी महाराज यांची परिसरातून रथामधून मिरवणूक काढण्यात आली. नागरिकांनी पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत केले. फटाक्यांची आतषबाजी, आकर्षक रांगोळ्या आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसराला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. महिला व पुरुषांनी यावेळी पारंपरिक फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना गोविंद देवगिरी महाराज यांनी प्रत्येकाने आपापल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे, असे आवाहन केले. अयोध्यानगर परिसरातील भक्तिमय वातावरण पाहून प्रत्यक्षात येथे अयोध्या अवतरल्याची भावना होत आहे.

या प्रसंगाचे औचित्य साधून अहिल्यानगरचे किशोर व्यास ते अयोध्या राम मंदिराचे महासचिव स्वामी गोविंददेवगिरी महाराज हा थक्क करणारा प्रवास अहिल्यानगरवासियांतर्फे अयोध्यानगर परिवाराने स्वामीजींना अयोध्याभूषण पुरस्काराने सन्मानित करून त्यांच्या या कार्याला साष्टांग दंडवत प्रणाम केला. या सोहळ्यासाठी विकी बोरा, निलेश चोपडा, भूषण बिहाणी, रजत दायमा, साईदीप ग्रुप तसेच कॉलनीतील रहिवासी व महिला यांचे विशेष सहकार्य लाभले. सोहळ्यास परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# मनाच्या श्लोकांवर आधारित 'मनोबोध' ॲपचे लोकार्पण



नगर – 'मनोबोध' या रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांवरील ग्रंथाचा आधुनिक आविष्कार अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टीफीशल इंटेलिजन्स) ए आय ची मदत घेऊन केलेल्या ॲपचे ज्येष्ठ समर्थ भक्त आणि श्री सुंदरमठ सेवा समितीचे विश्वस्त डॉ. विजय लाड यांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले.

ऑनलाईन झालेल्या या सोहळ्यात समर्थ रामदास स्वामींच्या अनेक मठांचे मठपती तसेच समर्थ वाङ्मयाचे अभ्यासक, चिंतक आणि संशोधक उपस्थित होते.

दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशनच्या तंत्रज्ञान शाखेतील चमूने व पुण्यातील आनंद जोगळेकर व त्यांचे कुटुंब आणि सहकारी मिळून मनाच्या श्लोकातील रहस्य सहजपणे उलगडण्यासाठी मनोबोध ए आय हे ॲप तयार केले आहे.

अध्यात्मिक क्षेत्रातली 'मनोबोध' हे एक क्रांतिकारी पाऊल आहे असे डॉ. विजय लाड यावेळी म्हणाले. बलोपासने बरोबरच किंबहुना किंचित जास्तच 'मनो' पासना आवश्यक होत आहे. 'मनोबोध' हे ॲप त्यासाठी अतिशय उपयुक्त ठरेल. तरुण पिढी बरोबरच सर्व वयोगटातील विशेषत: शालेय वयोगटातील मुलांची उत्सुकता क्षमवण्यासाठी हे ॲप मार्गदर्शक ठरेल.

मनाच्या श्लोकातून मानवी जीवनातील ताण–तणाव, कौटुंबिक, आर्थिक, वैचारिक प्रश्नांवर हे ॲप संदर्भांकित ओव्या आणि त्याचा अर्थ देऊन उत्तर देण्याचा प्रयत्न करते. महत्त्वाचे म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांतून विचारलेल्या प्रश्नांना संबंधित असलेल्या ओव्या आणि त्यांचा सार भावार्थ रूपाने हे ॲप काही क्षणातच समोर ठेवते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी करण्यासाठी वृंदा जोगळेकर, अमेय महाबळेश्वरकर, सौ. मुग्धा महाबळेश्वरकर, अपर्णा वांगीकर यांनी परिश्रम घेतले.



संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्समध्ये ३ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'आयएपी एक्सलन्स' मध्ये ३ पुरस्कार

### 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय', 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर' आणि स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर

पुणे – संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवित तीन पुरस्कार पटकावले. नवी दिल्ली येथील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित वर्ल्ड फिजिओथेरपी एशिया वेस्टर्न पॅसिफिक (डब्ल्यूपीएडब्ल्यूपी) या प्रादेशिक परिषदे दरम्यान झालेल्या विशेष समारंभात हे तीन पुरस्कार प्रदान करण्यात आले. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) चे अध्यक्ष डॉ.संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राधा भट्टड यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच संस्थेचे प्रमुख रुग्णालय असलेल्या संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन (एसआयओआर) ला 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर अवॉर्ड' आणि 'स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर अवॉर्ड हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील आयएपी या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आलेले आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स फिजिओथेरपी शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतात. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि डॉ. बीसी रॉय पुरस्काराचे मानकरी डॉ. के. एच. संचेती यांच्या दूरदृष्टीतून १९९५ मध्ये स्थापन झालेल्या या नॅक मान्यताप्राप्त संस्थेत फिजिओथेरपी पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.




# पोटफुगीवर करा हे उपाय

अन्न आणि पचनाशी संबंधित समस्या आहे. जेव्हा आपल्या पोटात जास्त गॅस तयार होऊ लागतो, जेव्हा आपण वेगाने जेवतो कवा आपल्याला एखाद्या गोष्टीची लर्जी असते, तेव्हा पोट फुगते. याशिवाय, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्यांमुळेदेखील फुगणे होऊ शकते.

**पण ते कसे बरे करावे?**

बडीशेप: बडीशेपमध्ये दाहक–विरोधी गुणधर्म असतात. ते पोट फुगण्याची समस्या कमी करण्यास मदत करतात. जर तुम्ही पाण्यात बडीशेप घालून ते उकळून दररोज पिण्यास सुरुवात केली, तर ते पोट निरोगी ठेवण्यास मदत करेल. यासोबतच, बडीशेप चहा तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासाठीदेखील फायदेशीर आहे.

**जिरे आणि ओवा पाणी**

जिरे आणि ओवा पोटाच्या समस्येसाठी फायदेशीर असतात. पोटफुगीच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी, एका ग्लास पाण्यात अर्धा चमचा जिरे आणि सेलेरी घाला आणि ते उकळू द्या. पाणी अर्धे झाल्यावर गॅस बंद करा आणि हे पाणी चहासारखे प्या. यामुळे पोटफुगी कमी होण्यास मदत होईल.

**आले आणि हग पाणी**

जेव्हा जेव्हा एखाद्याला पोटाचा त्रास होतो तेव्हा तो हग खातो कवा आल्याचा तुकडा चघळायला लागतो; पण जर तुम्ही हे



आरोग्य चर्चा

दोन्ही पाण्यात उकळून ते पाणी प्यायले, तर पोटफुगीची समस्या दूर होऊ शकते. तसेच, पोटाशी संबंधित इतर समस्या दूर करण्यासाठी हा उपाय फायदेशीर आहे.

**या तेलाने करा मालिश**

तुम्ही तुमच्या पोटाच्या खालच्या आणि सुजलेल्या भागाला एरंडेल तेलाने मसाज करू शकता. हा उपाय पोटफुगीची समस्या अगदी सहजपणे दूर करू शकतो. थंड तेलाऐवजी कोमट तेल वापरणे चांगले.

**योगासनांचा सराव**

तुम्हाला पोटफुगीची समस्या असेल तर काही योगासनांचा सराव करू शकता. जे पोट फुगी कमी करण्यासाठी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. बालासन आणि पवनमुक्तासन करू शकता.

# यकृताच्या विकाराचे निदान अवघड

लिव्हर म्हणजे शरीरातील एक महत्त्वाचा 'फिल्टर'! मात्र लिव्हरमध्ये काही बिघाड सुरू झाला, तरी लगेच वेदना होतीलच असे नाही. उलट अनेकदा लिव्हरचे नुकसान हळूहळू होत राहते आणि व्यक्ती नेहमीप्रमाणे काम करत, खात–पीत आपले आयुष्य जगत असते. त्यामुळे 'लिव्हर दुखत नाही म्हणजे सगळे ठीक आहे,' असा समज धोकादायक ठरू शकतो. लिव्हरच्या समस्या सुरू झाल्यानंतर शरीर काही दृश्य संकेत देऊ शकते. हे संकेत डोळे, त्वचा, लघवी, मल, पोट आणि पायांमध्ये दिसू शकतात. लिव्हरमध्ये गंभीर नुकसान झाले, तरी ते बराच काळ काम करत राहू शकते. त्यामुळे लिव्हरचे आजार अनेक वर्षे लक्षणांशिवाय राहू शकतात; मात्र काही वेळा शरीरातील बदल हे समस्या ओळखण्याचा महत्त्वाचा इशारा ठरू शकतात.

***डोळ्यांचा पांढरा भाग अचानक पिवळा होतो.**

लिव्हरच्या समस्येतील सर्वात ओळखण्याजोग्या लक्षणांपैकी एक म्हणजे कावीळ. लाल रक्तपेशी तुटल्यानंतर बिलीरुबिन तयार होते. निरोगी लिव्हर या पदार्थावर प्रक्रिया करून तो शरीरातून बाहेर जाण्यास मदत करते; मात्र लिव्हरचे कार्य बिघडले किंवा पित्ताच्या प्रवाहात अडथळा आला तर रक्तात बिलीरुबिन वाढू शकते. यामुळे सर्वात आधी डोळ्यांचा पांढरा भाग पिवळसर दिसू शकतो आणि नंतर त्वचेवरही पिवळेपणा जाणवू शकतो. त्यामुळे डोळे अचानक पिवळे दिसू लागले, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.



व्याधी विचार

***पुरेसे पाणी पिऊनही लघवी गडद होते.**

पाणी कमी प्यायल्यास लघवी गडद होणे सामान्य आहे; पण पुरेसे पाणी घेत असूनही लघवी गडद पिवळी, तपकिरी किंवा चहासारखी दिसत असेल तर त्यामागे दुसरे कारण असू शकते. लिव्हर किंवा पित्तप्रवाहाशी संबंधित समस्या असल्यास बिलीरुबिनचा काही भाग मूत्रपिंडांमार्फत बाहेर पडू शकतो. त्यामुळे लघवीचा रंग अधिक गडद होऊ शकतो. गडद लघवीसोबत डोळे किंवा त्वचा पिवळी दिसत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

***शौचाचा रंग बदलतो.**

शौचाचा तपकिरी रंग येण्यामध्ये पित्ताची महत्त्वाची भूमिका असते. पित्ताचा प्रवाह कमी झाला किंवा अडथळा निर्माण झाला तर शौचाचा रंग फिकट, राखाडी किंवा मातीसारखा दिसू शकतो. एखाद्या पदार्थामुळे एक–दोन वेळा रंग बदलणे वेगळे; पण कोणतेही स्पष्ट कारण नसताना हा बदल वारंवार होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष नको.

*** त्वचेला सतत खाज सुटते.**

खाज आली की, अनेकांना लगेच कोरडी त्वचा, उकाडा किंवा ॲलर्जीची आठवण होते. पण कोणतेही पुरळ नसताना सतत खाज येत असेल, तर त्यामागे इतर कारणांचाही विचार करायला हवा. पित्तप्रवाहात अडथळा निर्माण झाल्यास शरीरात काही पदार्थ जमा होऊन खाज वाढू शकते.

*** किरकोळ धक्का लागला तरी वारंवार निळे डाग पडतात.**

कारण नसताना किंवा अगदी किरकोळ धक्क्यायानंतरही वारंवार ब्रुजेस (निळे डाग) दिसू लागले तर त्याची तपासणी करणे गरजेचे आहे. लिव्हरचे कार्य गंभीरपणे बिघडलं तर रक्तस्राव नियंत्रित करण्याची शरीराची क्षमता प्रभावित होऊ शकते. त्यामुळे वारंवार निळे डाग, सहज रक्तस्राव आणि त्यासोबत इतर लिव्हर–संबंधित लक्षणे दिसत असतील, तर ते दुर्लक्षित करू नका.

*** पाय, घोटे किंवा पोट सुजते.**

पाय किंवा घोट्यांची सूज कायम राहणे किंवा वाढत जाणे हे तपासण्यासारखे लक्षण आहे. लिव्हरच्या प्रगत आजारामध्ये शरीरात द्रव साचून पाय आणि घोट्यांना सूज येते. पोटाच्या आत द्रव जमा होण्याला 'ॲसाइटिस' म्हणतात. यामुळे पोट फुगल्यासारखे, ताणल्यासारखे किंवा दिवसेंदिवस मोठे होत असल्यासारखे दिसू शकते.

***त्वचेवर लाल रक्तवाहिन्या दिसतात.**

त्वचेवर मध्यभागी एक छोटा लाल ठिपका आणि त्यातून बाहेरच्या दिशेने पसरलेल्या बारीक रक्तवाहिन्या दिसत असतील, तर त्यांना 'स्पायडर ॲंजिओमा' किंवा 'स्पायडर नेव्ही' म्हणतात. एक–दोन अशा खुणा दिसल्या म्हणजे लिव्हरचा आजार आहे असे अजिबात नाही. त्या इतर कारणांनीही होऊ शकतात; मात्र अशा अनेक खुणा अचानक किंवा मोठ्या प्रमाणात दिसू लागल्यास डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे योग्य ठरू शकते.

**लक्षण नव्हे, तर 'पॅटर्न' महत्त्वाचा!**

यांपैकी कोणतेही एक लक्षण दिसले, म्हणून लिव्हरचा आजार आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. उदाहरणार्थ, गडद लघवी डिहायड्रेशनमुळेही होऊ शकते आणि पायांची सूज हृदय किंवा किडनीशी संबंधित कारणांमुळेही येऊ शकते; मात्र लक्षणे वारंवार दिसत असतील, एकापेक्षा जास्त संकेत एकत्र दिसत असतील किंवा ते दिवसेंदिवस वाढत असतील, तर वैद्यकीय तपासणी महत्त्वाची आहे.

# लाभदायी कंसा वाटकी

आयुर्वेद आणि विकार

आपले पाय सतत कार्यरत असतात. शरीराचा सगळा भार पायांवरच असतो. म्हणूनच आपल्या पायांना आणि त्यातही पावलांना आराम मिळणं गरजेचं असतं. आयुर्वेदात कंसा वाटकी नावाचा मसाजचा प्रकार आहे. कंसा वाटकी म्हणजे धातूच्या भांड्याने कवा वाटीने केला जाणारा मसाज. हा मसाज खूप लाभदायी असतो. तांबं, झक आणि टिन अशा तीन धातूंपासून ही वाटी तयार केली जाते. हा प्रत्येक धातू खूप उपयुक्त असतो. ही वाटी पायांवर घासली जाते.

वाटीने पायांना मसाज केला जात असला तरी त्याचे लाभ संपूर्ण शरीराला मिळतात. या मसाजमुळे आपलं मनही स्थिर होतं. या थेरपीमुळे शरीराचं संतुलन साधलं जातं. पायाच्या नसांना चालना देण्यासाठी कंसा वाटकी हा अत्यंत योग्य असा मसाज आहे. हा मसाज ४५ मिनिटं केला जातो. मसाज केल्यानंतर थकलेल्या पायांना आराम मिळतो. रक्ताभिसरण वेगाने होऊ लागतं. पायाचे स्नायू, टिश्यूंचं कार्य सुधारतं. या मसाजमुळे संपूर्ण शरीरातली विषद्रव्यं बाहेर टाकली जातात.



# मधुमेहाची लक्षणे दिसतात पायावर

मधुमेह हा भारतामध्ये वेगाने वाढणार आजार आहे. अनेकांचा असा समज आहे, की मधुमेहामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढत असल्यामुळे परिणाम होते; पण केवळ रक्तातील साखरच वाढत नाही, तर शरीराच्या अनेक भागांवरही परिणाम होतो. जर या समस्यांवर सातत्याने दुर्लक्ष केल्यास समस्यांमध्ये वाढ होऊ शकते. मधुमेहाचा परिणाम होणार पायावर मोठ्या प्रमाणात दिसून येतो, जर रक्तातील साखर दीर्घकाळ नियंत्रणात राहिली नाही, तर रक्ताभिसरणाला हानी पोहोचू शकते. आता जर मधुमेहाची पायांशी संबंधित सुरुवातीची लक्षणे वेळेवर ओळखली गेली, तर हा आजार गंभीर होण्यापासून रोखता येतो. त्यामुळे मधुमेह ओळखण्याची कोणती लक्षणे असतात यासंदर्भात सविस्तर माहिती तुम्हाला सांगणार आहोत.

पायांमध्ये बधिरता, वेदना, जखमा आणि संसर्ग यांसारख्या समस्या असल्यास याकडे दुर्लक्ष करणे रुग्णांना महागात पडू शकते. रक्तामधील सातत्याने साखरेचे प्रमाण वाढत असल्यास शरीरामधील रक्तवाहिन्यांना सूज येते आणि त्यामुळे पायाकडे होणारा रक्तप्रवाह कमी होतो आणि त्यामुळे लहान जखमा लवकर बऱ्या होत नाहीत आणि त्यामुळे संसर्गाचा धोकादेखील वाढतो. मधुमेहाच्या लहान लक्षणांबद्दल सांगायचे झाले, तर पायांमध्ये वारंवार मुंग्या येतात आणि स्पर्शज्ञान कमी होऊ लागते, हे मधुमेहाची सुरुवातीचे लक्षण असते. काही लोकांना पायांमध्ये जळजळ, मुंग्या येणे किंवा रात्रीच्या वेळी अधिक वेदना होण्याचा अनुभव येतो. याची अनेक कारणे असू शकतात, तरीही सर्वप्रथम मधुमेहाची तपासणी करून घेणे गरजेचे आहे हे तुमच्यासाठी शहाणपणाचे ठरेल. पायावरची छोटी जखम, फोड किंवा दुखापत काही दिवसांपर्यंत बरी होत नसेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये, कारण त्यामुळे जंतुसंसर्ग होऊ शकतो.



आरोग्य चर्चा

मधुमेहाबद्दल सविस्तर सांगायचे झाले तर पायांना अकारण सूज येणे चांगले नसते. मधुमेही व्यक्तींमध्ये असे होऊ शकते आणि सततची सूज, लालसरपणा किंवा उष्णता हे संसर्ग किंवा रक्तप्रवाहातील समस्येचे लक्षण असू शकते. चालताना पोटऱ्यांमध्ये किंवा पायांमध्ये होणारी वेदना विश्रांतीनंतर कमी होणे, हे रक्तप्रवाहातील समस्येचे लक्षण असू शकते.

# अमेरिकेत वेगाने पसरतोय 'ब्लॅक लंग'

कधीकाळी मुलासोबत मासेमारीला जाणारा ४५ वर्षीय जॉन आज काही पावले चालतानाही धापा टाकतो. २० वर्षे कोळशाच्या खाणीत काम केल्यानंतर त्याच्या फुफ्फुसांचे इतके नुकसान झाले आहे की, आता साधा श्वास घेणेही त्याच्यासाठी मोठे आव्हान बनले आहे. ही केवळ जॉनची कहाणी नाही, तर अमेरिकेतील वेस्ट व्हर्जिनियामधील हजारो कोळसा कामगारांसमोर उभ्या राहिलेल्या गंभीर संकटाची झलक आहे. 'ब्लॅक लंग' म्हणून ओळखला जाणारा हा आजार पुन्हा वेगाने वाढत असून, यामागे कोळशाच्या धुळीसोबतच सिलिका धुळीचा वाढता संपर्कही महत्त्वाचे कारण ठरत आहे.

ब्लॅक लंगला वैद्यकीय भाषेत 'कोल वर्कर्स न्यूमोकॉनिऑसिस' असे म्हणतात. कोळशाच्या खाणीत काम करताना कामगारांच्या शरीरात सतत कोळशाची धूळ जाते. ही धूळ फुफ्फुसांमध्ये साचत राहते आणि कालांतराने फुफ्फुसांच्या ऊतींवर जखमा तयार होतात. यामुळे फुफ्फुसांची काम करण्याची क्षमता कमी होते. रुग्णाला सतत खोकला, दम लागणे आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. आजार गंभीर झाल्यास रक्तात पुरेसा ऑक्सिजन पोहोचत नाही आणि परिस्थिती जीवघेणी ठरू शकते. महत्त्वाचे म्हणजे, या आजारामुळे फुफ्फुसांना झालेले नुकसान पूर्णपणे पूर्ववत करणारा उपचार सध्या उपलब्ध नाही. औषधांद्वारे लक्षणांवर नियंत्रण ठेवता येते; मात्र फुफ्फुसांवरील कायमचे नुकसान भरून काढता येत नाही.



जाणून घ्या

अमेरिकेतील ॲपलाचिया भाग हा कोळसा खाण उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. या भागात सुमारे ३० हजार कोळसा कामगार काम करतात. अमेरिकेच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ऑक्युपेशनल सेफ्टी अँड हेल्थ'च्या (एनआयओएसएच) अभ्यासानुसार, या भागात २५ वर्षांपेक्षा जास्त काळ खाणीत काम केलेल्या कामगारांपैकी सुमारे एक तृतीयांश कामगारांना 'ब्लॅक लंग'चा आजार असल्याचे आढळले. हा आजार वाढण्यामागे फक्त कोळशाची धूळ नाही, तर सिलिका धूळ हे देखील मोठे कारण असल्याचे तज्ज्ञ सांगतात. खाणीतून सहज मिळणारा कोळसा कमी झाल्यानंतर कामगारांना जमिनीखाली अधिक खोलवर आणि कठीण खडकांमध्ये काम करावे लागते. या प्रक्रियेत हवेत बारीक सिलिका धूळ पसरते.

सिलिका धूळ फुफ्फुसांसाठी कोळशाच्या धुळीपेक्षा अधिक धोकादायक मानली जाते. त्यामुळे काही कामगारांना पूर्वीपेक्षा कमी वयात आणि अधिक गंभीर स्वरूपाचा 'ब्लॅक लंग' होत आहे. वेस्ट व्हर्जिनियातील एका क्लिनिकमध्ये 'ब्लॅक लंग'च्या सर्वात गंभीर प्रकारांपैकी एक असलेल्या 'प्रोग्रेसिव्ह मॅसिव्ह फायब्रॉसिस'चे निदान अवघ्या ३० वर्षांच्या व्यक्तीला झाले आहे. पूर्वी हा आजार प्रामुख्याने वृद्ध खाण कामगारांशी जोडला जात होता; मात्र आता तरुण कामगारांमध्येही त्याचे गंभीर प्रकार दिसत आहेत. 'ब्लॅक लंग'चा आजार गंभीर झाल्यानंतर रुग्णाला रोज श्वास घेण्यासही त्रास होतो. काही रुग्णांमध्ये ऑक्सिजनची गरज वाढते. वेस्ट व्हर्जिनियातील तज्ज्ञांच्या मते, काही ४० वर्षांच्या रुग्णांनाही दोन्ही फुफ्फुसांच्या प्रत्यारोपणासाठी यादीत ठेवावे लागत आहे. त्यांच्या जीवासाठी हा शेवटचा पर्याय ठरू शकतो.

# रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी...

कोणत्याही विषाणू किंवा जीवाणूची लागण होऊ नये, यासाठी आपण प्रत्येकानेच योग्य ती खबरदारी घ्यायला हवी. यासाठी आपण प्रत्येकानेच योग्य ती खबरदारी घ्यायला हवी. मुख्य म्हणजे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवायला हवी. फक्त कोरोना व्हायरसच नाही तर इतर आजारांना रोखण्यासाठीही प्रतिकारशक्ती गरजेची असते. प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काही घटकांचा समावेश आहारात करायला हवा.

* अळशी म्हणजे जवस खूप गुणकारी आहे. यात सिलियम आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असतं. दररोज चमचाभर अळशी खाल्ल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढू शकते. अळशी दुधासोबतही खाता येईल.



काय खावं?

* तुळशीच्या गुणांबद्दल आपण जाणतोच. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुळशीची पानं खावीत. तुळशीची पाच पानं आणि मध यांच्या एकत्रित सेवनाने रोगप्रतिकारक क्षमता वाढू शकते.

* सूर्यफुलाच्या बियांमध्ये जवसाप्रमाणे सेलेनियम असतं.

# मूळव्याध समजण्याची चूक नको

शौचातून रक्त पडणे हे फक्त मूळव्याधाचे लक्षण नसून, कोलन किंवा रेक्टल कॅन्सर (मोठ्या आतड्याचा किंवा गुदद्वाराचा कर्करोग) यांसारख्या गंभीर आजाराचाही संकेत असू शकतो. कोलन कॅन्सरचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास उपचारांनी रुग्णाला पूर्णपणे बरे करता येते. मूळव्याध आणि आतड्याच्या कॅन्सरमधील फरक समजून घेणे आवश्यक आहे. गुदद्वाराच्या किंवा मलाशयाच्या भागातील शिरा सुजल्यामुळे, जुनाट बद्धकोष्ठता, गरोदरपण, लठ्ठपणा किंवा शौचास जोर लावल्याने मूळव्याध होतो. यात पडणारे रक्त अतिशय ताजे आणि लालचुटूक असते. ते टॉयलेट पॉटमध्ये किंवा पेपरवर दिसते. सोबत खाज, सूज आणि तीव्र वेदना जाणवू शकतात. मोठ्या आतड्याच्या आतील थरात असामान्य पेशींची अनियंत्रित वाढ झाल्यामुळे कोलन कॅन्सर होतो.



कॅन्सरमधील रक्त हे गडद लाल किंवा शौचामध्ये मिसळलेले असू शकते. यात पोटाशी संबंधित इतर गंभीर समस्या एकाच वेळी दिसून येतात.

काळजी घ्या

**आतड्याच्या कॅन्सरची ५ लक्षणे**

* २ ते ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत बद्धकोष्ठता होणे, जुलाब होणे, किंवा शौचाचा आकार खूप बारीक होणे. * शौचावरून आल्यानंतरही सतत साफ झाले नाही, असे वाटत राहणे. * कोणताही आहार किंवा व्यायाम न बदलता अचानक वजन वेगाने कमी होणे. * अंतर्गत रक्तस्रावामुळे शरीरात रक्ताची कमतरता होऊन सतत प्रचंड थकवा, अशक्तपणा किंवा धाप लागणे. * पोटात सतत गोळे येणे, गॅस होणे किंवा पोट फुगल्यासारखे वाटणे.

# साधा ताप समजून दुर्लक्ष नको

पावसाळ्याच्या सरींसोबत आजारांचाही 'सीझन' सुरू होतो! उन्हाळ्याच्या कडक उकाड्यापासून दिलासा देणारा पाऊस सुरू होताच वातावरणात बदल होतो आणि विषाणूजन्य संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे ताप, सर्दी, खोकला, घसादुखी, अंगदुखी आणि अशक्तपणाच्या तक्रारी घेऊन डॉक्टरांकडे येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढू लागते. बहुतांशी व्हायरल फिव्हर काही दिवसांमध्ये योग्य विश्रांती आणि काळजीने बरा होतो; मात्र 'साधा ताप' समजून लक्षणांकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते, कारण काही प्रकरणांमध्ये संसर्ग गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

पावसाळ्यातील वातावरणात थंडावा आणि आर्द्रता वाढते. त्यामुळे काही विषाणूंच्या प्रसारासाठी पोषक परिस्थिती निर्माण होते. त्यातच तापमानात वारंवार होणारे बदल, पाणी साचणे, अस्वच्छता आणि गर्दीच्या ठिकाणी वावरल्याने संसर्गाचा धोका अधिक वाढतो. पावसाळ्यात अनेकजण घराबाहेर पडणे टाळतात. त्यामुळे संक्रमित व्यक्तीच्या खोकण्यातून किंवा शिंकण्यातून बाहेर पडणारे थेंब, तसेच दूषित पृष्ठभागाला स्पर्श केल्याने विषाणूंचा प्रसार सहज होऊ शकतो. अपुरी झोप, असंतुलित आहार आणि ताणतणाव यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते आणि संसर्गाचा धोका वाढू शकतो. व्हायरल फिव्हरमध्ये अचानक ताप येणे, थंडी वाजणे, डोकेदुखी, घसादुखी, खोकला, नाक वाहणे किंवा नाक चोंदणे, अंगदुखी, सांधेदुखी, थकवा आणि भूक मंदावणे अशी लक्षणे दिसू शकतात. बहुतांश रुग्ण ३ ते ७ दिवसांत पुरेशी विश्रांती, भरपूर द्रवपदार्थांचे सेवन आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने घेतलेल्या औषधांमुळे बरे होतात.



व्याधी विकार

ताप तीन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत असेल किंवा वारंवार येत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. श्वास घेण्यास त्रास होणे, अशक्तपणा जाणवणे, सतत उलट्या होणे, गोंधळल्यासारखे वाटणे, छातीत दुखणे, शरीरात तीव्र पाण्याची कमतरता होणे किंवा त्वचेवर पुरळ येणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. लहान मुले, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच मधुमेह, हृदयरोग किंवा कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींनी ताप किंवा संसर्गाची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घेणे अधिक गरजेचे आहे. या व्यक्तींमध्ये संसर्गामुळे गुंतागुंत होण्याचा धोका तुलनेने अधिक असतो.

पावसाळ्यात व्हायरल फिव्हरपासून बचाव करण्यासाठी काही सोप्या उपायांची नियमितपणे अंमलबजावणी करता येते. हातांची स्वच्छता, स्वच्छ आणि उकळून थंड केलेले पाणी पिणे, ताजे व शिजवलेले अन्नाचे सेवन करणे, सतत पावसात भिजणे टाळणे, ओले कपडे वेळीच बदलणे आणि वैयक्तिक स्वच्छता राखणे आवश्यक आहे. यासोबतच पुरेशी झोप घेणे, संतुलित आहाराचे सेवन करणे आणि नियमित शारीरिक हालचाल करणे यामुळेही आरोग्य चांगले राखण्यास मदत होते.

नवसंशोधन

## स्मार्टफोनमुळे वाढतो डोकेदुखीचा त्रास!

स्मार्टफोनच्या अतिवापराचे बरेच दुष्परिणाम आहेत. त्यातच आता एक नवी बाब समोर आली आहे. स्मार्टफोनमुळे डोकेदुखीचा त्रास वाढू शकतो, असं 'एम्स'च्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. नियमित डोकेदुखी तसंच मायग्रेनची समस्या असणाऱ्या स्मार्टफोन वापरकर्त्यांचा त्रास दुपटीने वाढल्यामुळे ते वेदनाशामक औषधं घेऊ शकतात. यामुळे त्रास कमी होण्याऐवजी वाढू शकतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. 'न्यूरोलॉजी : क्लिनिकल प्रॅक्टिस' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. या संशोधनात ४०० लोकांचा अभ्यास करण्यात आला.



डोळ्यांचं आरोग्य

## डोळे का होतात लाल?

डोळे लाल होणं ही सर्वसाधारण समस्या मानली जाते. डोळे लाल होण्यामागे काही कारणंही असतात. डोळ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात अश्रूंची निर्मिती झाली नाही तर ते कोरडे पडतात. याला वैद्यकीय भाषेत ड्राय आय असं म्हणतात. ओलाव्याच्या कमतरतेमुळे डोळ्यांमध्ये अस्वस्थता जाणवते. यामुळे डोळे लाल दिसू लागतात. पापण्यांलगत होणाऱ्या दाहामुळेही डोळे लाल होऊ शकतात. स्मार्टफोन, कॉम्प्युटर स्क्रीनमुळे डोळ्यांवर प्रचंड ताण येतो. डोळे थकून जातात आणि लालसर दिसू लागतात.



जपणूक केसांची

## कारणं केस गळण्याची...

केस गळण्याला अनेक गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. शरीरात लोहाची कमतरता असल्यास केस गळू शकतात. लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होऊ शकतो. शरीरात रक्ताची कमतरता निर्माण झाल्यास केस गळू शकतात. वजन कमी करण्यासाठी बरेचजण डाएटिंग करू लागतात. आहारातून अनेक पोषक घटक वर्ज्य केले जातात. यामुळे शरीरात जीवनसत्त्वं, खनिजं यांची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. ठराविक वयानंतर महिलांचे केस गळू लागतात. थायरॉइडची समस्याही केस गळण्याला कारणीभूत ठरू शकते.



आजीबाईचा बटवा

## बहुगुणी कापूर

धार्मिक कार्यक्रमांमध्ये कापराचा वापर होतो. मात्र हाच कापूर औषधीही आहे. कापरातल्या जंतूनाशक गुणांमुळे बरेच लाभ होऊ शकतात. कापरामुळे सौंदर्यवृद्धी होऊ शकते. कापरासह त्याचं तेलही खूप गुणकारी असतं. कापराचं तेल चेहऱ्यावर लावल्यामुळे फोड, मुरमं, पुटकुळ्या बऱ्या होतात. चेहऱ्यावरचे डाग घालवण्याची क्षमताही या तेलात आहे. कापराच्या तेलाने मसाज केल्यास ताण कमी होऊ शकतो. पायांचा जंतूसंसर्गही कापराच्या वापरामुळे दूर होऊ शकतो.



# अहिल्यानगरमध्ये जाणवू लागले 'ऑक्टोबर हीट'चे तीव्र चटके

## कमाल तापमान ३५.२ अंश सेल्सिअसवर तर किमान तापमान गेले २४.४ अंशांवर

नगर – मान्सूनचा पाऊस संपून परतीचा प्रवास सुरू होताच अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात 'ऑक्टोबर हीट'चे तीव्र चटके जाणवू लागले आहेत. ३० सप्टेंबर रोजी शहराचे कमाल तापमान ३१ अंश सेल्सिअस होते, त्यात १ ऑक्टोबर रोजी थेट ४ अंशांनी वाढ होऊन ते ३५ अंशांवर पोहोचले. तर २ ऑक्टोबर रोजी ३५.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले असून किमान तापमानातही वाढ झाली आहे.३ ऑक्टोबर रोजी सकाळी किमान तापमान २४.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे.

गेल्या वर्षी १ ऑक्टोबरला शहराचे कमाल तापमान २८ अंश आणि किमान २१ अंश होते. मे महिन्यात झालेला २२० मिमी अवकाळी पाऊस आणि जून ते सप्टेंबरदरम्यान कायम असलेला जोर यामुळे गेल्या वर्षी जमिनीतील ओलाव्यामुळे उष्णता कमी होती. यंदा मात्र जून ते सप्टेंबर या काळात बहुतांश दिवस कोरडे गेले असून जिल्ह्यात अजूनही ३० टक्के पावसाची तूट आहे. परतीच्या पावसाचे अवघे १४ दिवस उरले असतानाही पावसाने पाठ फिरवल्यामुळे यंदा ऑक्टोबर हीटची तीव्रता अधिक जाणवत आहे. ३ ऑक्टोबरपासून तापमानात आणखी वाढ होऊन पारा ३६ अंशांवर जाण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ऑक्टोबरचा दुसरा व तिसरा आठवडा उष्णतेचा राहील. महिनाअखेरपर्यंत तापमान ३८ अंशांपर्यंत जाऊ शकते. असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

शहरात गेल्या २–३ दिवसात उष्णता वाढल्यामुळे विजेचा वापरही वाढला आहे. दुपारच्या वेळी उन्हाचे चटके उन्हाळ्यासारखे बसत आहेत. तर सायंकाळी आणि रात्रीही उकाडा जाणवत आहे. परतीचा पाऊस जर झाला नाही तर या उकाड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. या वाढत्या उकाड्यात दुपारच्या वेळी तळपत्या उन्हात नागरिकांनी घराबाहेर पडू नये, उष्माघातापासून स्वत:ला वाचविण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी, पाणी भरपूर प्यावे असा सल्ला तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे.



## गुरुवाणी – ६९
### तीर्थंकर हृदयात हवेत...

सुधर्मा स्वामींसारखा दुसरा कोणी नाही की ज्यांनी आपला अहंकार शून्य केला. त्यांच्यामुळे कोणीच डिस्टर्ब झाला नाही. आपण अहंकारातूनच एखाद्याला डिस्टर्ब करतो आणि शत्रू बनवतो. सुधर्मा स्वामींनी अद्भुत रितीने भगवान महावीरांची अनुभूती केली. त्या अनुभूतीला आपण थोडं जरी ग्रहण केले तरी तुमची सुधर्मा स्वामी बनण्याची यात्रा सुरू होईल. जर तुम्ही तुमच्या घराचे, समाजाचे , संघटनेचे सुधर्मा स्वामी बनलात तर तुम्हाला पाहून लोकांना तीर्थंकर महावीर आठवतील. तुमचा व्यवहार पाहून तुमचा समाज आठवला पाहिजे. गुरूदेवांच्या प्रवचनात एक दाखला आहे. एका योगीकडे एक व्यक्ती गेला. योगी सांगायचे 'तुम्ही जिथे नजर टाकाल तिथे प्रभू दिसतात'. तो व्यक्ती म्हणाला, 'तुम्ही काहीपण सांगता, मला तर कुठे प्रभू दिसत नाहीत'. योगीने त्या व्यक्तीला आरसा दिला आणि विचारले तुला काय दिसते? त्या व्यक्तीला स्वतःचे प्रतिबिंब दिसते. मग योगीने त्या आरशाचा पाठीमागील पारा पुसून टाकला. आता त्या काचेतून समोरचे दिसून आले. योगीनी सांगितले, 'जो पर्यंत तुझ्या मनात अहंकाराचा पारा आहे, तोपर्यंत तुला भगवंत दिसणारच नाही. तू फक्त स्वतःलाच पाहशील'. इंद्रभूती गौतम तीर्थंकरांचे सर्वात जवळचे शिष्य होते. पण जंबूस्वामींनी सुधर्मा स्वामींना तीर्थंकर कसे आहेत हे विचारले? परमज्ञानी असला तरी त्याच्या मनात परमात्म्याचे स्पंदन असायला हवे. तीर्थंकरांची अपार शक्ती सुधर्मा स्वामींनी अनुभवली. त्यांनी सुमेरू पर्वत जाणला. तुम्ही भगवान महावीरांशी जोडू इच्छिता तर तुम्ही त्यांच्या मध्यापर्यंत जायला पाहिजे. पूर्वीच्या काळात वैद्य नाभीवर उपचार करून पोटाचे आजार दूर करायचे. कारण शरीरातील ७२ हजार नाडींचे केंद्र नाभीत असते. शक्ती केंद्रात जो पोहचतो तो सगळ्यांवर राज्य करतो. सीमेवर तर सीमा रक्षक असतो. केंद्रात राजा राहतो. जो तुमच्या केंद्रात असतो तोच तुमचा राजा असतो. तीर्थंकर महावीरांची संपूर्ण शक्ती विश्वाच्या केंद्रात आहे. त्या केंद्रापर्यंत तुम्हाला जायचे आहे. एकदा तीर्थंकर केंद्रस्थानी आले तर तुमच्या सर्व बेड्या सहज तुटतात. तीर्थंकरांना भक्तीपूर्वक हृदयात स्थापन करा. पूर्ण वारकरी संप्रदायाच्या केंद्रात विठ्ठल आहे, म्हणून उन वारा पाऊसात पाऊले पंढरीची वाट चालतात. अहिल्यानगरच्या केंद्रस्थानीही तीर्थंकर आले पाहिजे. आगम म्हणजे तीर्थंकर वाणी आहे. पण पुच्छिसुणं हे सुधर्मा स्वामींची भक्ती असूनही आगम बनली. ज्यांच्या केंद्र स्थानी प्रभू असतात त्याचे प्रत्येक वचन शासन असते.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# फ्लॅटवरील कर्ज लपवून २३ लाखांची फसवणूक

## पुणे येथील दाम्पत्याविरूध्द अहिल्यानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – फ्लॅटवर बँकेचे कर्ज असल्याची माहिती लपवून तो कर्जमुक्त असल्याचे भासवत फ्लॅटची विक्री करून २३ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी १ ऑक्टोबर रोजी दाम्पत्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी जगन्नाथ गोपीनाथ पाठक (वय ७३, रा. साईविरा हाईट्स, तपोवन रोड, अहिल्यानगर, हल्ली रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे.

मयत रामचंद्र साहेबराव पारधी आणि त्यांची पत्नी संगीता रामचंद्र पारधी (रा. भिवाडे खुर्द, ता. जुन्नर, जि. पुणे) यांच्याविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मे २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत तपोवन रोडवरील संस्कृती मंगल कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या साईविरा हाईट्समधील फ्लॅट क्रमांक २०२ तसेच सह दुय्यम निबंधक कार्यालयात हा व्यवहार झाला. रामचंद्र पारधी व संगीता पारधी यांच्या नावावर हा फ्लॅट होता. त्यांनी यापूर्वी सदर फ्लॅटवर एचडीएफसी बँकेकडून कर्ज घेतले होते. फिर्यादी जगन्नाथ पाठक यांना फ्लॅट विक्री करताना संबंधितांनी कर्जाची माहिती लपविल्याचा आरोप आहे. तसेच, कागदपत्रे पाहण्याची गरज नाही. ७/१२ उताऱ्यावर कोणत्याही कर्जाचा बोजा नाही. फ्लॅट निर्वेध निजोखमी आहे, असे सांगून पाठक यांचा विश्वास संपादन केला. फ्लॅटवर कर्जाचा बोजा असल्याची माहिती असतानाही आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने तो फ्लॅट पाठक यांना विकण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या व्यवहारातून पाठक यांची एकूण २३ लाख रूपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पाठक यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरून तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस अंमलदार बाळासाहेब गिरी करीत आहेत.

# जिल्ह्यात फरार व पाहिजे आरोपींच्या शोधासाठी विशेष मोहिम; स्थानिक गुन्हे शाखेकडून ४ फरार व ४ पाहिजे आरोपींचा शोध

नगर – महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये फरार व पाहिजे आरोपींच्या अभिलेखाचे शुद्धीकरण करण्यासाठी १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी नगर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना फरार व पाहिजे आरोपींना जेरबंद करण्याचे व योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने ४ फरार व ४ पाहिजे आरोपींचा शोध घेत कारवाई केली आहे.

२ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलीस अंमलदारांनी फरार व पाहिजे आरोपींचा कसून शोध घेतला. यादरम्यान नेवासा पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी कुणाल बापू पवार (रा. शेंडी, ता. नगर), कोतवाली पोलीस ठाण्याकडील फरार आरोपी शिवाजी सोन्याबापू साबळे (रा. तपोवन रोड, अहिल्यानगर) व गणेश मधुकर झेंडे (रा. नालेगाव, अहिल्यानगर) तसेच पारनेर पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी अनिल रतन येणारे (रा. रांजणगाव मशीद, ता. पारनेर) या चारही जणांना शोधून संबंधित पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

तसेच तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील पाहिजे आरोपी अक्षय बाबुराव धनवे (रा. प्रेमदान हाडको, अहिल्यानगर), ऋतीक तुळशीराम गायकवाड (रा. निलक्रांती चौक, अहिल्यानगर) आणि निखिल अजय साळवे (रा. निलक्रांती चौक, अहिल्यानगर) या तीन आरोपींचे न्यायालयातून जामीन झाले असल्याने त्यांचे जामीन आदेश संबंधित पोलीस ठाण्यात सादर करण्यात आले आहेत. एमआयडीसी पोलीस ठाण्याकडील फरार आरोपी संतोष बाबुराव सोनवणे (रा. निंबळक, ता. अहिल्यानगर) हा मयत झाल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे मयत प्रमाणपत्र पोलीस ठाण्यात सादर करून अभिलेखावरून नाव कमी करण्यासाठी अहवाल देण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी ही कारवाई केली आहे.



**कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक 'सर्वोत्कृष्ठ बँक' पुरस्काराने सन्मानित**

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर यांच्याकडून सहकारी बँकांमधून गटवार पद्धतीने रु. १००० कोटींच्यावर ठेवी असणाऱ्या बँका या गटातून, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेस 'सर्वोत्कृष्ट बँकेचा' पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार बँक्स असो.चे अध्यक्ष निपुण कोरे व उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे चेअरमन स्वप्निल आवाडे, व्हा. चेअरमन सीए संजयकुमार अनिगोळ, व्यवस्थापकीय संचालक मंडळाचे चेअरमन सीए चंद्रकांत चौगुले, बँकेचे संचालक सुभाष जाधव, महेश सातपुते, बाबूराव पाटील, शैलेश गोरे, अविनाश कांबळे, व्यवस्थापकीय संचालक मंडळ सदस्य सचिन देवरुखकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे, तसेच अन्य सहकारी बँकांचे प्रतिनिधी या सत्कार समारंभास उपस्थित होते.

# चेक बाऊन्स प्रकरणी आरोपीला ६ महिने कारावास व १० लाखांचा दंड

नगर – नेवासा तालुक्यातील सोनई येथील श्री वैष्णवी कुरीज प्रा. लि. या चिट फंड कंपनीला दिलेला चेक बाऊन्स झाल्याप्रकरणात नगर येथील अतिरिक्त चिफ जुडिशिअल मॅजिस्ट्रेट न्यायालयाने आरोपी अश्विन तुकाराम गिऱ्हे (रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर) यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत सहा महिने साध्या कारावासाची आणि १० लाख ३ हजार ४७५ रुपयांच्या नुकसान भरपाईची शिक्षा सुनावली आहे. तसेच, ही नुकसान भरपाईची रक्कम ३० दिवसांच्या आत न दिल्यास अतिरिक्त सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

वैष्णवी कुरीज प्रा. लि. या चिट फंड कंपनीकडून तेजस तुकाराम गिऱ्हे यांनी २५ लाख रुपयांची भिशी घेतली होती. भिशीचा हप्ता नियमितपणे भरण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र त्यांनी हप्त्याची रक्कम थकीत ठेवली. या थकीत रकमेपोटी जामीनदार असलेले अश्विन तुकाराम गिऱ्हे (आरोपी) यांनी ६ लाख ९० हजार रुपयांचा चेक ११ मार्च २०२५ रोजी फिर्यादी कंपनीला दिला होता.

फिर्यादी कंपनीने हा चेक त्यांच्या आयडीबीआय बँक, शाखा दिल्लीगेट, अहिल्यानगर येथील खात्यात वटण्यासाठी भरला असता, खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्यामुळे चेक न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादी कंपनीने अश्विन तुकाराम गिऱ्हे यांच्याविरुद्ध न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. या खटल्यात न्यायालयाने फिर्यादी कंपनीचा पुरावा ग्राह्य धरून आरोपीला दोषी ठरवले व शिक्षेची अंमलबजावणी केली. या खटल्यामध्ये फिर्यादी कंपनीच्या वतीने दिलीप परसराम घुमे (डायरेक्टर) व माहितगार इसम म्हणून गणेश हिरालाल दायमा यांनी काम पाहिले, तर फिर्यादी कंपनीतर्फे ॲड. प्रवीण मुटकुळे यांनी युक्तिवाद करत सक्षमपणे बाजू मांडली.

## संशयास्पदरीत्या फिरणारा तरूण पकडला

नगर – वाडिया पार्क मैदान परिसरात रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत भिंतीच्या आडोशाला संशवितरीत्या लपून बसलेल्या तरूणाला कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई १ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास ब्लॅक स्पॉट पेट्रोलिंगदरम्यान करण्यात आली.

राहुल छगन गायके (वय ३२. रा. केदरे वस्ती, सारसनगर, अहिल्यानगर, हल्ली रा. वैष्णवनगर, केडगाव) असे ताब्यात घेतलेल्या तरूणाचे नाव आहे. पोलीस अंमलदार विनोद बोरगे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. १ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास पोलीस अंमलदार बोरगे, विशाल दळवी व सूरज कदम हे कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत ब्लॅक स्पॉट पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी ते वाडिया पार्क मैदान परिसरात गेले असता, भिंतीच्या आडोशाला अंधाराचा फायदा घेत एक इसम संशयितरीत्या बसलेला आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव राहुल छगन गायके असल्याचे सांगितले. रात्रीच्या वेळी संशयास्पदरीत्या फिरत असल्याच्या संशयावरून त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शिर्डी येथे ८ व ९ ऑक्टोबरला राष्ट्रीय अधिवेशन

**समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणावर होणार मंथन**

नगर – राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने ८ व ९ ऑक्टोबर रोजी शिर्डीजवळील निमगाव–निघोज येथील साई पालखी निवारा येथे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन, प्रशिक्षण शिबिर व चर्मकार समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. चर्मकार समाजाचे संघटन अधिक मजबूत करणे, समाजातील युवकांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे, आर्थिक सक्षमीकरण साधणे आणि सामाजिक–शैक्षणिक प्रगतीला चालना देणे, हा या अधिवेशनाचा प्रमुख उद्देश आहे. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



बाळासाहेब केदारे

या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप भूषवणार आहेत. तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांच्यासह राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व व्यावसायिक उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे, उपाध्यक्ष राजेंद्र बुंदिले आणि अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे यांनी महाराष्ट्रासह देशभरातील चर्मकार समाजातील बांधव, भगिनी, युवक–युवती, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## जागेत खडी टाकल्याच्या कारणावरून मारहाण

नगर – शहरातील तारकपूर परिसरातील शांतीपूर भागात एका मोकळ्या जागेत खडीची गाडी खाली करण्यावरून झालेल्या वादातून ७० वर्षीय वृद्धाला लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गॅब्रियल लक्ष्मण बारसे (वय ७०, रा. शांतीपूर, तारकपूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्याच मोकळ्या जागेत खडीची गाडी खाली होत असताना तिथे उभे होते. यावेळी आरोपी रुबीन जॉर्ज देठे तिथे आला आणि वाद घालू लागला. फिर्यादीने आरोपीला तू कोणाला विचारून माझ्या जागेत खडी टाकली? अशी विचारणा केली. या गोष्टीचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व वाईट भाषेत शिवीगाळ केली. तसेच तू माझ्या नादी लागला तर तुला व तुझ्या घरातील सर्वांना जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत हातातील लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी रुबीन देठे याच्या विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



न्यू इंग्लिश स्कूलच्या १९७५ च्या बॅचच्या स्नेहमेळाव्यामध्ये एकत्र आलेले माजी विद्यार्थी.

## महिलेला लाथाबुक्यांनी मारहाण करत विनयभंग

नगर – केडगाव परिसरात लिंक रोडवरील भुषणनगर भागात एका म महिलेला मारहाण करत तिचा विनयभंग केल्याची घटना २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संबंधित फिर्यादी महिला ही परिसरातील एका शेजारील महिलेसोबत गप्पा मारत उभी होती. यादरम्यान तिथे आलेला आरोपी शुभम बारहाते (रा. लिंक रोड, भूषणनगर, केडगाव) याने त्यांना इथे जोरात गप्पा मारू नका असे म्हणत वाद घातला.त्याने महिलेला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली. एवढेच नव्हे तर, आरोपीने फिर्यादी महिलेस तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी शुभम बारहाते याच्याविरुद्ध विनयभंग व मारहाणीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



**सर्वात मोठ्या ग्रीटिंग कार्डची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना माहिती**

अहिल्यानगर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारीजचे ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हरके यांनी भारताचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्ली येथील कर्तव्य पथ परिसरातील कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त साकारण्यात आलेल्या ६० फूट उंच आणि ४४ फूट रुंद सर्वात मोठ्या ग्रीटिंग कार्डची माहिती मंत्री अमित शाह यांना दिली. यावेळी या ऐतिहासिक ग्रीटिंग कार्डची छायाचित्र असलेली विशेष फोटो फ्रेम सस्नेह भेट म्हणून प्रदान करण्यात आली.

# न्यू इंग्लिश स्कूल १९७५ च्या बॅचचा तब्बल ५२ वर्षांनंतर स्नेह मेळावा उत्साहात

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूलच्या १९७५ च्या बॅचचा स्नेह मेळावा डीएसपी चौक, हॉटेल पंचवाटीका येथे उत्साहात झाला. तब्बल ५२ वर्षांनंतर जुने वर्गमित्र, मैत्रिणी एकत्र आल्याने आठवणींना उजाळा मिळाला. याप्रसंगी बालमित्र व मैत्रीणी उपस्थित होते. स्नेह मेळाव्याच्या सुरुवातीला गेल्या ५२ वर्षात दिवंगत झालेल्या जुन्या मित्र–मैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत, प्रतिज्ञा व शाळेतील प्रार्थना सौ. रंजना पारखे, अंजली इनामदार भिसे, दीपा भालेराव देव यांनी म्हटली.

प्रास्ताविक करताना लक्ष्मीकांत झंवर म्हणाले की, १९७५ साली आपण शाळेच्या बाकावरून बाहेर पडलो आणि आज ५२ वर्षांनी पुन्हा त्याच बाकावर बसल्यासारखे वाटत आहे. या मेळाव्याचा उद्देश केवळ एकत्र येणे नाही तर आपल्या शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा आहे. ज्या शाळेने आणि शिक्षकांनी आपल्याला घडवले त्यांची आयुष्यभर आठवण रहावी म्हणून सर्व मित्रांच्या सहकार्याने हा मेळावा होत आहे.

या मेळाव्याला लक्ष्मीकांत झंवर, डॉ.पारस कोठारी, ज्ञानेश्वर रासकर, राजेंद्र देव, मिलिंद गांधी, सुधीर झालानी, दिपक खिस्ती, श्रेणिक कांकरिया, राजेंद्र मेहेर, ओमप्रकाश खंडेलवाल, विनायक कुलकर्णी, उपेंद्र कुलकर्णी, सुधीर खेर, प्रदीप कोठारी, प्रकाश देसरडा, प्रमोद राठोड, वाजीदीन इनामदार, प्रकाश गुंदेचा, अनिल आहेर, सुभाष खत्री, नितीन नागुलपेल्ली, रंजना पारखे, अंजली इनामदार, जयश्री कटरिया, महेंद्र चंदे, दशरथ गाडळकर, सुधाकर धोरपडे, गणेश भालेराव, जगन्नाथ बहिरवाडे, प्रदीप भंडारे, बजरंग भुतारे, सावळेराम गुंजाळ, रत्नाकर डोळसे, संजय गाडिलकर, मोहन फुलडहाळे, रामचंद्र जिंदम, शिवाजी सानप, सतिष सुरपुरिया, अशोक खंडेलवाल, अर्चना गांधी, श्रीकृष्ण जोशी, रमेश भोजवाणी, अजीत ताथेड, दिपा भालेराव, कमलाकर पाठक, मोरेश्वर मुळे, डुंगरवाल आदी उपस्थित होते.

सुधीर झालानी म्हणाले, आज आपण सगळे ६५–७० वर्षांचे झालो आहोत, कोणी निवृत्त झाले, कोणी व्यवसायात आहे, पण मनाने आजही आपण न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थीच आहोत. काळ कितीही पुढे गेला तरी बालपणीची मैत्री कधीच जुनी होत नाही. आपण मिळून शाळेसाठी आणि समाजासाठी काहीतरी चांगले करूया. पुढील वर्षी पुन्हा नक्की भेटूया,असा शब्द सर्वांनी दिला.

ज्ञानेश्वर रासकर म्हणाले, यंदाच्या गणेशोत्सव काळात माळीवाडा येथील नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात मी स्वतः पुढाकार घेऊन आपल्या सर्व मित्र मैत्रिणींना सहपरिवार निमंत्रण देऊन सर्वांसह गणपती बाप्पांची महाआरती केली. नंतर आयोजीत स्नेह मेळाव्या निमित्त बालमित्र भेटले, आनंद झाला. संपर्क होत नसला तरी सर्व मित्र व मैत्रीणींनी ऋणानुबंध आजही कायम जपला आहे. सर्वांनी एकमेकांच्या सुख व दुःखात सहभागी व्हावे. तसेच या पुढील काळातही मेळाव्याचे आणि गणपतीच्या महाआरतीचे आयोजन करावे.

आलेल्या सर्व मित्र मैत्रिणींचा परिचय महेंद्र चंदे यांनी करून दिला.

या स्नेह मेळावा प्रसंगी डॉ. पारस कोठारी व शिवाजी सानप यांनी सुमधुर आवाजात जुने गीत सादर केले. मनोरंजनाचे खेळ आयोजित केले. तसेच या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका मंदाकिनी कुलकर्णी यांचा यथोचित सत्कार सर्वांनी मिळून केला आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. कार्यक्रमासाठी अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, हैदराबाद, सातारा, कराड, कोपरगाव येथील जुने मित्र मैत्रिणी उपस्थित होते.

सूत्रसंचालन लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. स्नेह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र मेहेर, सुधीर झालानी, विनायक कुलकर्णी, राजेंद्र देव, सावळेराम गुंजाळ, ज्ञानेश्वर रासकर, महेंद्र चंदे, रंजना पारखे, पुण्याहून मिलिंद गांधी, पारस कोठारी, ओमप्रकाश खंडेलवाल, प्रदीप कोठारी, लक्ष्मीकांत झंवर आदींनी परिश्रम घेतले.

# शहर सहकारी बँकेतर्फे अविनाश देडगावकर यांचा सत्कार

नगर – गेल्या अनेक वर्षापासून निःस्वार्थ भावनेने उत्कृष्ट समाजसेवा करित आल्याबद्दल अविनाश देडगावकर यांच्या कार्याची दखल घेऊन अहमदनगर शहर सहकारी बँक लिमिटेड तर्फे अहिल्यानगर बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा निमित्ताने सावेडी माऊली सभागृह येथे २९ सप्टेंबर रोजी बँकेचे चेअरमन गिरिश घैसास, व्हा.चेअरमन माणिक विधाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ शाल देऊन अहिल्यानगर येथील अविनाश देडगावकर यांचा सत्कार करण्यात आला.



या वेळी संचालक संजय घुले, संचालक सुभाष गुंदेचा, संचालक डॉ. विजयकुमार भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, संचालिका सौ. स्वाती कांबळे, संचालिका श्रीमती रेश्मा आठरे काही संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

